पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

बुधवार, दि. २० मे २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०२६ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ पुणे कृषि हॅकथॉन २०२६ मध्ये राहुरी विद्यापीठाचा डंका

४ इंधन बचत आवाहनाला देशात सर्वप्रथम संजीवनीचा ई – प्रतिसाद

५ ६ वर्षांचा लढा यशस्वी ! पीडित महिलेला मिळाला घराचा ताबा



पान ८ वर..

# इंधनदराचा भडका: पेट्रोल-डिझेलसह सोने, पावाच्या दरातदेखील वाढ

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : जागतिक बाजारपेठेत क्रूड ऑईलच्या (कच्चे तेल) किंमतीत होत असलेल्या प्रचंड चढ–उतारामुळे देशांतर्गत इंधनदरांचा भडका उडाला आहे. मंगळवारी देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सोनेदरातदेखील वाढ होत आहे. इंधन टंचाईमुळे आता पावाच्यादरातदेखील वाढ होत आहे. पेट्रोल प्रतिलिटर ८७ पैशांनी तर डिझेल प्रतिलिटर ९१ पैशांनी महागले आहे. विशेष म्हणजे, अवघ्या आठवड्याभरापूर्वीच केंद्र सरकारने देशभरात पेट्रोल–डिझेलच्या दरात ३ रुपयांची वाढ केली होती, त्यानंतर लागोपाठ झालेली ही दुसरी दरवाढ आहे.

पेट्रोल–डिझेलच्या दरवाढीचा फटका आता सीएनजी वाहनधारकांनाही बसला आहे. दिल्ली आणि परिसरात सीएनजीच्या दरात प्रति किलो १ रुपयाची वाढ करण्यात आली. दोन दिवसांतील ही दुसरी वाढ आहे. या नवीन वाढीमुळे दिल्लीत सीएनजी ८०.०९ रुपये प्रति किलो झाला आहे, तर नोएडा आणि गाझियाबादमध्ये हा दर ८८.७० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे.

जागतिक तेल बाजारातील अनिश्चिततेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रेंट क्रूडच्या किंमती प्रति बॅरल १०० डॉलर्सच्या पार गेल्या आहेत. अमेरिका, इस्त्रायल आणि



इराण यांच्यातील वाढत्या भू–राजकीय तणावामुळे जागतिक क्रूड पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून त्याचा थेट परिणाम भारतावर होत आहे. दरम्यान, केंद्रीयमंत्री किरेन रिजिजू यांनी या इंधन दरवाढीचे समर्थन केले आहे. पश्चिम आशियातील (मिडल ईस्ट) संकटामुळे अनेक देशांना इंधन दरवाढीचा मोठा फटका बसला आहे. मात्र, त्या देशांच्या तुलनेत भारताने इंधनावरील दरवाढ बऱ्याच अंशी नियंत्रणात ठेवली आहे, असा दावा त्यांनी केला.

आठवड्यात दुसऱ्यांदा सोन्याच्या किंमती वाढल्याने सर्वसामान्यांना मोठा झटका बसला आहे. सोन्याच्या किंमतीबरोबरच दूध, पाव अन् इतर वस्तूंच्या किंमतीही झपाट्याने वाढत आहेत. आज सराफा बाजार उघडताच सोन्याच्या किंमतीमध्येही वाढ नोंदवण्यात आली. २४ कॅरेट सोन्याची किंमत प्रति तोळा ८२० रूपयांनी वाढली आहे. २४ कॅरेट सोने प्रति तोळा १,५७,१९० रूपयांवर पोहचले आहे . मुंबई, पुणे, जळगाव ते दिल्ली अन् कोलकाता या प्रत्येक शहरात सोन्याच्या किंमतीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे.गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या किंमतीत मोठी घसरण झाली होती. पण सोमवार आणि मंगळवारी सोन्याच्या दरात अचानक वाढ झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील हल्ले थांबवल्यामुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत घट झाली आणि त्यामुळे अमेरिकन डॉलर कमकुवत झाला. त्यामुळे मंगळवारी (१९ मे) सकाळी एमसीएक्सवर सोन्याच्या दरात वाढ झाली. देशांतर्गत सराफा बाजारातही सोन्याच्या दरात वाढ झाली.

आता 'पाव' महागले

सर्वसामान्यांना अजून एक फटका बसला आहे. पेट्रोल डिझेलचे दर वाढले आहेत, त्यानंतर आता पावाच्या किंमती वाढल्या आहेत. पावाच्या किंमती ५ रुपयांनी वाढल्या आहेत. याआधीच दुधाच्या किंमती २ रुपयांनी वाढल्या आहे त्यानंतर आता पाव आणि ब्रेडच्या किंमतीदेखील वाढल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या महिन्याच्या बजेटला चांगलाच धक्का बसणार आहे.

# पुणे विभागात केवळ 33 टक्के पाणीसाठा

## पाणी जपून वापरण्याचे जलसंपदा विभागाचे आवाहन

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : राज्यात सध्या सर्व विभागांत मिळून सुमारे ३ हजारांहून अधिक धरणांमध्ये सध्या केवळ सुमारे ३४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे पावसाळा सुरू होऊन धरणात पुरेसा साठा होईपर्यंत पाणी जपून वापरण्याचे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे. त्यात यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी पडण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. त्यामुळे अगदी ऐन पावस–ाळ्यातही पाण्याची काटकसर करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. राज्यात सर्वाधिक पाणीसाठा अमरावती विभागात ४४.३९ टक्के साठा असून, सर्वांत कमी साठा पुणे विभागात केवळ २५.२६ टक्के साठा उरला आहे.



राज्यातील नागपूर, अमरावती, संभाजीनगर, नाशिक, पुणे, कोकण या विभागांत मिळून एकूण ३ हजार २८ मोठे, मध्यम व लघु प्रकल्प समाविष्ट आहेत. त्यातही सर्वांत अधिक प्रकल्प छत्रपती संभाजीनगर विभागात असून, त्यांची संख्या ९२९ एवढी आहे. तर सर्वांत कमी प्रकल्प कोकण विभागात असून, त्याची संख्या १७३ एवढी आहे. यंदा उन्हाळा अत्यंत कडक आणि असह्य करणारा आहे. त्यामुळे मार्च महिन्यापासूनच धरणांमधील पाण्याची बाष्पीभवन मोठ्या प्रमाणावर झाले तसेच सिंचन आणि नागरिकांना पिण्यासाठीदेखील पाण्याचा वापर वाढला आहे. त्यामुळे पाण्याचा उपसा वाढला. परिणामी धरणांमधील पाण्याची पातळी सरासरीपेक्षा खूपच खालावली आहे. पाण्याचा वापर जपून करण्याच्या सूचना जलसंपदा विभागामार्फत शेतकरी व नागरिकांना करण्यात आल्या आहेत.

## संक्षिप्त

### विधानसभाध्यक्षांचा 'प्रस्ताव' अखेर बेस्टकडून माघारी

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : गेट वे ऑफ इंडिया परिसरातील बेस्ट बसचा मार्ग बदलून बसथांबा छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयासमोर स्थलांतरित करण्याबाबतचा विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या प्रस्तावाला बेस्ट समितीच्या सोमवारच्या बैठकीत जोरदार विरोध करण्यात आल्याने तो प्रशासनाकडे परत पाठविण्यात आला. सार्वजनिक वाहतुकीऐवजी खासगी वाहने आणि टॅक्सीचालकांना प्राधान्य देणारा हा प्रस्ताव सामान्य प्रवाशांच्या हिताविरोधात असल्याने नामंजूर करण्याची मागणी बैठकीत केली.

नार्वेकर यांनी सूचना केल्याने उपक्रमाकडून याबाबतचा प्रस्ताव समितीमध्ये मांडण्यात आला. गेट वे ऑफ इंडिया परिसरात मोठ्या प्रमाणात देश विदेशातील पर्यटक येतात. त्यामुळे येथे वाहनांची व पादचाऱ्यांची मोठी गर्दी असते. या परिसरामध्ये बेस्टचा बसथांबा असून बसगाड्यांमुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन नागरिकांना त्रास होतो. त्यामुळे बसथांबा स्थलांतरित करण्याची सूचना नार्वेकरांनी केली होती.

सध्या अहिल्याबाई होळकर चौक (चर्चगेट) व छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून गेट वे ऑफ इंडिया दरम्यान सोमवार ते शनिवार दररोज सरासरी ४३६ बसफेऱ्यांमधून २४ हजार प्रवासी प्रवास करतात व सरासरी १ लाख १७ हजार इतका महसूल बेस्ट उपक्रमाला मिळतो. हेच प्रमाण रविवार व सुट्टीच्या दिवशी वाढते व एकूण ५९८ बसफेऱ्यांमधून २८ हजार प्रवासी प्रवास करतात व सरासरी १ लाख ९८ हजार इतका महसूल उपक्रमाला मिळतो.

### जीएसटी महाघोटाळाप्रकरणी मुंबईत अमित उपाध्यायला अटक

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : बनावट जीएसटी बिले तयार करून सुमारे ४० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी मुंबई जीएसटी विभागाकडून अमित उपाध्याय याला अटक करण्यात आली आहे. अमित उपाध्याय हा ८ पेक्षा अधिक कंपन्यांचा संचालक असून, बनावट कागदपत्रे आणि खोट्या व्यवहारांच्या आधारे सुमारे ४० कोटी रुपयांचा जीएसटी रिटर्न मिळवल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

तपासात माल किंवा सेवा पुरवठा न करता बनावट इनव्हॉइसच्या माध्यमातून परतावा घेतल्याचे समोर आल्याची माहिती आहे. उपाध्यायविरोधात एमआरए मार्ग पो–लीस ठाणे तसेच ईडीकडेही तक्रारी दाखल आहेत. एमआरए मार्ग पोलीस ठाण्यात अनिस खान यांनीही आर्थिक फसवणूक आणि कट रचून फसवणूक केल्याची तक्रार अमित उपाध्यायविरोधात दिली आहे.

# बनावट सोन्याचा मोठा घोटाळा! तारण ठेवून राष्ट्रीयीकृत बँकेची ४ कोटींची फसवणूक

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : बनावट सोने तारण ठेवून राष्ट्रीयीकृत बँकेची चार कोटी २३ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात दोन सराफ व्यावसायिकांसह १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राष्ट्रीयीकृत बँकेच्या व्यवस्थापकाने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सराफ व्यावसायिकांसह १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे सिंहगड रस्त्यावरील हिंगणे खुर्द येथील एका राष्ट्रीयीकृत बँकेत शाखा व्यवस्थापक आहेत. आरोपी सराफ व्यावसायिकांची बँकेकडून मूल्यांकनकार (व्हॅल्यूअर) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. आरोपींनी बँकेत कमी शुद्धतेचे सोने तारण ठेवून कर्ज मिळवले.



आरोपी मूल्यांकनकार यांनी बनावट सोने हे शुद्ध असल्याचे प्रमाणपत्र बँकेला दिले होते.

बनावट प्रमाणपत्राच्या आधारे आरोपींनी २६ कर्जप्रकरणांद्वारे बँकेकडून चार कोटी ४४ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करवून घेतले. आरोपी मूल्यांकनकारांनी दिलेल्या प्रमाणपत्राबाबत बँकेला संशय आला. त्यामुळे बँकेत तारण ठेवलेल्या या सोन्याचे परीक्षण पुन्हा करण्यात आले. तेव्हा फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक दीपाली भुजबळ तपास करत आहेत.

# ठेकेदारासाठी शहरात साठवला कचरा ?

## ५०० कोटींच्या निविदेवरून पुणे काँग्रेसचा आरोप

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : ५०० कोटी रुपयांच्या घनकचरा व्यवस्थापन निविदा प्रक्रियेवरून राजकीय वातावरण तापले आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप) ठराविक कंपनीला फायदा पोहोचवण्यासाठी कचरा व्यवस्थापनात जाणीवपूर्वक हलगर्जीपणा करत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसचे गटनेते रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांनी याबाबत आरोप केले. 'भूमी ग्रीन' या कंपनीलाच निविदा मिळावी यासाठी शहरात कचऱ्याची समस्या कृत्रिमरीत्या निर्माण केली जात असल्याचा दावा त्यांनी केला. शहरात कचऱ्याचे ढीग साचू दिले जात



असून नागरिकांना वेठीस धरले जात आहे, असे कदम म्हणाले.

कदम यांच्या मते, कचऱ्याचा प्रश्न जाणीवपूर्वक तीव्र करून नवीन निविदा प्रक्रियेला गती देण्याचा हा प्रयत्न आहे. यामुळे शहरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण होत असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याची टीका त्यांनी केली.

या प्रकरणी प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अन्यथा काँग्रेसतर्फे शहरभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कदम यांनी दिला आहे. दरम्यान, या आरोपांवर महापालिका प्रशासन किंवा सत्ताधारी भाजपकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, घनकचरा व्यवस्थापनाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून येत्या काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले की, कचरा साठलेला नाही तर कचरा साठवला गेलेला आहे. कचरा माफियाकडून हा प्रकार शहरात केला आहे. एक मोठे पाचशे टनाचे टेंडर मान्य केले जात नाही म्हणून कचरा उचला जात नाही. वादग्रस्त अधिकारी असलेला काटकर यांच्याकडे हा विभाग झोपवण्यात आले आहे. कचरा माफीयाकडून शहराला वेठीस धरले जात आहे. या निविदेच्या माध्यमातून ७०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला जाणार आहे. हे टेंडर मंजूर केले जात नाही म्हणून ही समस्या निर्माण केलेली आहे. कचरा न उचलणाऱ्या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करावे. महापौरांनी कठोर कारवाई करावी.

# कोथरूडमध्ये तरुणावर जीवघेणा हल्ला; दोघांना अटक

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : कोथरूड भागात तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना घडली. सोमवारी रात्री गोपीनाथनगर भागात ही घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली. साहिल दशरथ कांबळे (वय २५, रा. श्रावणधारा वसाहत, कोथरूड) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी सुयश शिरसाट आणि ओम साळुंखे यांना अटक करण्यात आली. दोघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कांबळे आणि आरोपींमध्ये वाद झाला होता. या प्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. सोमवारी रात्री साहिल हा गोपीनाथनगर परिसरात थांबला होता. त्या वेळी आरोपी शिरसाट आणि साळुंखे तेथे आले. दोघांनी कांबळेला शिवीगाळ केली. त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आले. गजबजलेल्या रस्त्यावर कांबळे याच्यावर हल्ला करण्यात आल्यानंतर तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. हा प्रकार पाहताच नागरिकांमध्ये घबराट उडाली. पसार झालेल्या आरोपींना पोलिसांनी मध्यरात्री अटक केली.

# भरधाव कारची टेम्पो अन् दुचाकीला जोरदार धडक; एकाचा जागीच मृत्यू

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुण्यामध्ये ३ वाहनांच्या विचित्र अपघाताची घटना घडली. या अपघातामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला तर तिघेजण गंभीर जखमी झाले. हा अपघात शिरूर तालुक्यातील पाबळ येथे झाला. भरधाव कारने आधी छोट्या टेम्पोला नंतर दुचाकीला धडक दिली. हा भीषण अपघात रस्त्याच्या कडेला लावलेल्या सीसीटीव्ही कॅमऱ्यात कैद झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिरुर तालुक्यातील पाबळ रस्त्यावर कारने ओव्हरटेक करताना टेम्पो आणि दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये टेम्पोमध्ये असलेली एक महिला आणि एक पुरूष दूरवर फेकले गेले, तर दुचाकीवरून जाणारी व्यक्ती रस्त्याच्या कडेला पडली. या अपघातामध्ये दुचाकीस्वार थोडक्यात बचावला. अपघातामध्ये चारजण गंभीर जखमी झाले होते. यामधील एकाचा मृत्यू झाला, तर इतर जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



या अपघाताचा अंगावर काटा आणणारा सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये दिसत आहे की, एक भरधाव वेगात पांढऱ्या रंगाची कार येत आहे. ही कार विरुद्ध दिशेने जात आहे. या कारने ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात समोरून येणाऱ्या टेम्पोला धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की, टेम्पोमध्ये बसलेली महिला आणि पुरूष काचा फुटून रस्त्यावर फेकले गेले. त्यानंतर टेम्पो रस्त्यावर उलटला. त्यानंतर या कारने दुचाकीस्वाराला धडक दिली.

# आर्थिक फसवणूक केल्याने उद्योजकाची आत्महत्या; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : डेक्कन जिमखाना परिसरातील एका तारांकित हॉटेलमध्ये आत्महत्या केलेल्या उद्योजकाची आर्थिक फसवणूक झाल्याने त्यांनी हे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मोहित अशोक जैन (वय ३२, रा. मीनाक्षी सोसायटी, सॅलिसबरी पार्क, गुलटेकडी) यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, नथुसिंह राजपुरोहित, सतीश राजपुरोहित, भगवान राजपुरोहित, प्रल्हाद चौधरी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक जैन हे उद्योजक होते. आपटे रस्ता परिसरातील एका तारांकित हॉटेलमध्ये त्यांनी १० मे रोजी विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. जैन यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेली चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली होती. या प्रकरणी सुरुवातीला अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली. आरोपींनी जैन यांची आर्थिक फसवणूक केल्याने त्यांनी आत्महत्या केल्याचे मोहित जैन यांनी फिर्यादीत म्हटले आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस उपनिरीक्षक भोसले या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# दोन वर्षांपूर्वी हरवलेले मोबाईल शोधण्यात बेलवंडी पोलिसांना यश

## २ लाख १० हजारांचे २० मोबाईल नागरिकांना परत; तांत्रिक तपासातून कारवाई

जनप्रवास । प्रतिनिधी

श्रीगोंदा : बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या दोन वर्षांमध्ये हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यात बेलवंडी पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. पोलिसांनी विविध कंपन्यांचे सुमारे २ लाख १० हजार रुपये किमतीचे मोबाईल शोधून काढत ते संबंधित नागरिकांच्या ताब्यात परत दिले आहेत. या कारवाईमुळे मोबाईल धारकांमध्ये समाधान व्यक्त होत असून बेलवंडी पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

हरवलेल्या मोबाईल संदर्भात दाखल अर्ज व तक्रारींच्या अनुषंगाने



बेलवंडी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी तांत्रिक तपास सुरू केला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर तसेच पोलीस शिपाई फिरोज तांबोळी यांनी आधुनिक तांत्रिक माहितीच्या आधारे मोबाईलचा मागोवा घेत तपासाची चक्रे फिरवली.

या तपासादरम्यान रेडमी, विवो, वन प्लस आणि सॅमसंग कंपनीचे एकूण २० मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले. संबंधित मोबाईलवरून वापरकर्त्यांशी संपर्क साधत मूळ मालकांची माहिती मिळवण्यात आली. त्यानंतर सर्व मोबाईल ताब्यात घेऊन संबंधित नागरिकांना पोलीस ठाण्यात बोल–ावण्यात आले आणि आवश्यक पडताळणीनंतर मोबाईल परत करण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करत बेलवंडी पोलीस स्टेशनचे आभार मानले. तसेच नागरिकांच्या मालमत्तेचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी केलेल्या तांत्रिक तपास व तत्पर कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पत्नीशी फोनवर बोलणाऱ्या तरुणावर चाकू हल्ला

जनप्रवास प्रतिनिधी :

पिंपरी : माझ्या पत्नीशी फोनवर का बोलतोस असा जाब विचारत एकाने तरुणावर चाकूने वार करून त्याला गंभीर जखमी केले. ही घटना रविवारी (१७ मे) रात्री साडेदहाच्या सुमारास किवळे परिसरात घडली.

याप्रकरणी ३४ वर्षीय व्यक्तीने देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी ३१ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि आरोपी एकाच इमारतीत राहतात. रविवारी रात्री फिर्यादी टेरेसवर गेले असताना तिथे आरोपी आला. पत्नीशी फोनवर बोलण्यावरून जाब विचारला. त्यानंतर त्याने सोबत आणलेल्या चाकूने वार केले.

# अग्रलेख : पुन्हा मराठा आरक्षणाचा एल्गार

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यातील राजकीय व सामाजिक वातावरण पुन्हा एकदा तापू लागले आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी येत्या ३० मेपासून अंतरवाली सराटी येथे आपण पुन्हा एकदा आमरण उपोषणाचा एल्गार पुकारला आहे. सन २०२३ पासून सुरू झालेल्या या संघर्षातील जरांगे पाटील यांचे हे नववे उपोषण असणार आहे. 'आमच्या नादी लागू नका, या आंदोलनात ३ कोटी मराठी बांधव सहभागी होतील', असा इशारा त्यांनी सरकारला दिला. जरांगे पाटील यांनी सरकारच्या दुटप्पी भूमिकेवर कडक शब्दांत टीका केली आहे. सरकारने हैदराबाद गॅझेट लागू केला असला तरी सातारा गॅझेटची अंमलबजावणी अद्याप प्रलंबित असल्याचा आरोप त्यांनी केला. मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यात सरकार चालढकल करत असून दिलेली आश्वासने हवेत विरली आहेत, असे ते म्हणाले. सातारा, कोल्हापूर, पुणे, औंध, मिरज या संस्थानांच्या १९९४ च्या शासन निर्णयानुसार प्रलंबित प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी लावून धरली आहे.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र आणि आरक्षण मिळावे, यासाठी जरांगे पाटील यांनी सरकारसमोर काही महत्त्वाच्या मागण्यांचा पुनरुच्चार केला आहे. मराठा बांधवांच्या रक्ताच्या नात्यातील आणि विवाहाच्या नोंदी असलेल्या नातेवाईकांनाही (सगे-सोयरे) कुणबी प्रमाणपत्र देण्याचा अध्यादेश तातडीने लागू करावा. थांबलेले कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप त्वरित सुरू करून या नोंदी ग्रामपंचायतींच्या दफ्तरी अधिकृतपणे लावण्यात याव्यात. आंदोलनादरम्यान मराठा बांधवांवर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे विनाअट मागे घ्यावेत. मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमिती बरखास्त करावी, अशा त्यांच्या मागण्या आहेत. आरक्षणाच्या प्रक्रियेत ५८ लाख नोंदी सापडूनही सरकार टाळाटाळ करत असल्याचा त्यांनी आरोप केला. भाजपमधील मराठा नेत्यांना उद्देशून बोलताना जरांगे म्हणाले, या आरक्षणाची गरज तुमच्या घरातील लेकीबाळींना भासणार नाही का? एकनाथ शिंदे यांनी ज्याप्रमाणे विशेष मोहीम राबवून कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप केले तशीच तत्परता देवेंद्र फडणवीस यांनीही दाखवावी. सत्तेच्या बळावर शहाणपण शिकवणा-यांनी हे लक्षात ठेवावे की, मराठ्यांशिवाय हे शहाणपण चालणार नाही.

आपल्याकडे संपत्तीचे पाठबळ नाही, मोठे धनदांडगे आपल्यासोबत येत नाहीत कारण आपण प्रामाणिक आहोत. आपले आंदोलन दडपणे व आपल्या विरोधात वातावरण निर्मितीसाठी एका मंत्र्याने १६ संघटनांना प्रत्येकी २ कोटी रुपये वाटल्याचा दावा त्यांनी केला. पैशाच्या जोरावर आंदोलन फोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत; पण आपण डगमगणार नाही, असे ते म्हणाले. मराठा आरक्षणाच्या लढाईत ऐतिहासिक दस्तऐवजांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. गतवर्षी २९ ऑगस्टला जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावरील आंदोलन याच ऐतिहासिक पुराव्यांच्या मागणीसाठी होते. त्या वेळी हैदराबाद व सातारा संस्थानांच्या गॅझेट्सची अंमलबजावणी करण्याची मागणी लावून धरली होती.

या आंदोलनानंतर राज्य सरकारने सकारात्मक पावले उचलत हैदराबाद गॅझेटला मान्यता दिली होती. त्यामुळे मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले होते; पण सातारा गॅझेटचा मुद्दा आजही प्रलंबित असून तो तांत्रिक व सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत कळीचा ठरला आहे. जरांगे यांचा असा दावा आहे की, १८८१ च्या सातारा संस्थानच्या अधिकृत नोंदीमध्ये मराठा समाजाची लोकसंख्या २५ लाख दर्शवण्यात आली आहे. जर प्रत्येक कुटुंबात सरासरी ५ ते १० सदस्य गृहीत धरले तर केवळ पश्चिम महाराष्ट्रातच मराठा समाजाची लोकसंख्या सुमारे २ कोटींच्या घरात पोहोचते. जरांगे यांच्या या दाव्यामुळे आरक्षणाच्या लढाईत लोकसंख्येच्या प्रमाणाचा एक नवा निकष समोर आला आहे. सातारा गॅझेटवरून सत्ताधारी व आंदोलकांत कलगीतुरा रंगला आहे. गतवर्षीच्या आंदोलनादरम्यान आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी या पुराव्याचे महत्त्व मान्य केले होते मात्र, केवळ सातारा संस्थानच्या नोंदीवर लक्ष केंद्रित केल्यास इतर भागातील प्रक्रिया मागे पडण्याची भीती त्यांनी व्यक्त केली होती.

या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांनी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खानदेश आमचाच आहे, असे म्हटले होते. आंदोलन केल्याशिवाय सरकार काही ऐकत नाही, असे जरांगे म्हणाले. माझ्या समाजाचे वाटोळे होणार असेल तर मी तुम्हाला कोणालाच मोजणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे. जरांगे यांच्या आंदोलनाच्या घोषणेनंतर गुणरत्न सदावर्ते यांनी पत्रकार परिषद घेत त्यांच्यावर जोरदार टीका केली. जरांगे यांचे आंदोलन हे शेतकरी व मराठा समाजाच्या ख-या प्रश्नांपासून दूर असून ते राजकीय नखरे करत आहेत. त्यांना शेतक-यांच्या प्रश्नांशी काहीही देणे-घेणे नाही. ते कधीही संविधानिक प्रश्नांवर बोलत नाहीत.

मनोज जरांगे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यकर्ते असू शकतात. ते केवळ राजकीय भूमिका घेत आहेत. उदय सामंत भेटल्यावर तो बिळातून बाहेर आला. मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून जरांगे उचकले आहेत, असे सदावर्ते म्हणाले. जातवैधता प्रमाणपत्राच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रक्रिया सुरू असून त्यात सरकारचा कोणताही हस्तक्षेप नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. सातारा गॅझेट लागू करण्याबाबत विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार व न्यायालयीन प्रक्रियेचा आदर राखूनच पावले उचलली जात असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यमान सरकारने मराठा समाजासाठी जेवढे काम केले तेवढे महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही झाले नसल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला आहे.



## अंतरंग

### परिक्षेची परवड पहावेना...

सद्या देशभर नीट परिक्षेची जी एकूण परवड झालेली आहे ती पाहून प्रत्येक सुजाण नागरिक आणि शिक्षणप्रेमी खूपच अस्वस्थ आहेत अर्थात असा अक्षम्य गैरप्रकार आजच होतो आहे असे मुळीच नाही. यापूर्वीही अशाच केंद्र शासनाकडून घेतल्या जाणाऱ्या परिक्षांमध्ये गैरप्रकार झाल्याचे वेळोवळी समोर आलेले आहे. पण यावेळी ज्यापध्दतीने या साऱ्या व्यवहारतून मिळकतीचे जे प्रश्न समोर आलेले आहेत ते मात्र सर्वसामान्य नागरिकाला अत्यंत अस्वस्थ करणार आहेत.




परिक्षेच्या व्यवहारातील गोपनियता ही परिक्षांतर्गत जरी बाब असली तरी परिक्षेचे सर्वच व्यवहार शंकातीक असले पाहिजेत. फार पूर्वी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी म्हंटले होते की, शिक्षण हा सराकरचा उद्योग नव्हे तर तो लोकाश्रयावरच चालला पाहिजे. आज कर्मवीरांच्या या सांगण्याची पुन: पुन्हा आठवण होते आहे. पेपर फुटणे ही जरी प्रसंगी परिक्षेशी संलग्न असणाऱ्या सर्व घटकांची जबाबदारी मानली गेली असली तरी नेमका दोषारोप करणे बऱ्याचवेळा अवघड होऊन बसते. पण यावेळी मात्र आपल्या गुप्तचर यंत्रणेने आणि पोलिसांनी ही बाब नजरेआड होऊ दिली नाही आणि त्यांचे खाणकाम सुरू झाले. एकेक चेहरे जसे समोर येत गेले तसे शिक्षणाची पुण्यभूमी असलेल्या क्षेत्रातील मॉडर्नसारख्या अव्वल दर्जाच्या महाविद्यालयातील एक विदुषी यात थेट सहभागी असाव्यात या दुर्देवाला काय म्हणणार. शिवाजी विद्यापीठात एकेकाळी डॉ. वरुटे हे कुलगुरू असताना असा काही प्रकार झाल्याचे त्यांच्या कानावर आले आणि त्यांनी आपल्या सहकार्यांशी चर्चा करून संबंधीत मंडळी परिक्षा विभागात पुनश्च काम करणार नाहीत अशी तजवीज केली. याचा फारसा गवगवाही झाला नाही. परिक्षा ही केवळ तांत्रिक असत नाही. तर ती परिक्षा घेणाऱ्यांच्या आणि देणार्यांच्या चारित्र्याशी संबंधीत असते हे कसे नजरेआड करता येईल. त्यामुळे परिक्षांची गोपनीयता जितकी महत्वाची असते तितकाच त्या सर्व अभ्यासक्रमाचा गुणवत्तेशी तितकाच संबंध असतो. कारण यावेळी आणखी एक गोष्ट समोर आलेली आहे आणि ती म्हणजे यातील गुन्हेगार मंडळींनी सुमार बुध्दीच्या पण श्रीमंत असलेल्या उमेदवारांना गाठून त्यांच्याकडून उदंड रकमा वसुल केल्या आहेत. यातील अनेकांच्या मिळकती कोट्यवधीच्या घरात आहेत. यातच बहुचर्चित लातूर पध्दतीची चर्चा समोर आली आणि खासगी शिकवणी वर्गाचे बिंग फुटले. आता सर्वसामान्य माणूस साऱ्याच शिकवण्यावर कायमची बंदी घाला असे म्हणू लागला आहे. सकृतदर्शनी हे जरी शक्य नसले तरी खासगी शिकवण्यांच्या बाबतीत कडक धोरणाची अंमलबजावणी मात्र त्वरित गरजेची झालेली आहे. आणि हे आता शालेय स्तरापासून आपण लक्षात घेणे अगत्याचे होऊन बसले आहे. कधीकाळी पदवीधर झालेल्या मुलाचे गल्लीभर कौतुक होत असे. आज एखादा हुशार तल्लख बुध्दीचा माणूस जरी विद्यावाचस्पती झाला तरी त्याकडे आपण फारशा उत्सुकतेने पाहात नाही. याचे एकमेव कारण म्हणजे परिक्षेचा आणि शिक्षणाचा ढासळत गेलेला दर्जा हेच आहे. त्यामुळे ज्यांना कुठेच संधी मिळत नाही अशी माणसे याक्षेत्राकडे वळू लागली आणि परिणामत: या क्षेत्रातील गुणवंत शिक्षकांचीपण परवड हौऊ लागली आपण या घटनेचा एकत्रित विचार केला तर असे लक्षात येते की, हे असले प्रकार जर भविष्यात पुर्नांशाने टाळायचे असतील आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होणारी धुलवड जर थांबवायची असेल तर सरकारला अत्यंत कठोर पावले उचलावी लागणार आहेत. त्याशिवाय असला अघोरी शैक्षणिक प्रताप थांबणार नाही. शिक्षण क्षेत्रातील अक्षम्य गुन्हेगारी सातत्याने वाढते आहे. याचे कारण या संपूर्ण समाजाची जडण-घडण करणाऱ्या क्षेत्रात काही अव्वल दर्जाचे आणि गुणवत्तेला केंद्रस्थानी बनवून शैक्षणिक महती अधोरेखीत करणारे असे नियम होणे अगत्याचे आहे. त्याशिवाय या क्षेत्राची महती सर्वांच्याच लक्षात येईल असे वाटत नाही. याकरिता खासगी शिक्षण वर्ग आणि तत्सम स्वरूपाच्या सर्वच संस्थांच्यासाठी आता शासनाने आचारसंहिता निर्माण करणे अगत्याचे आहे. तशी जर ती निर्माण केलेली असेल तर त्यात लक्षणीय सुधारणा होणे गरजेचे आहे. याच्याशिवाय समाजाला सरकार याबाबतीत पुरेसे गंभीर आहे. हे लक्षात येणार नाही. हा प्रश्न दुसऱ्या बाजुला शिक्षणाच्या स्वायत्ततेशीही निगडीत आहे. आपल्या कडील अनेक तरूण आजही अमेरिकेकडे शिक्षणासाठी धाव घेत असतात. याचे कारण तीथे शिक्षणात जी पत्थे पाळली जातात तशी ती आपल्याकडे तेवढ्या काटेकोर पध्दतीने पाळली जात नाही, हेच या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखीत झाले आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी सुरु असलेला हा असला विनाशकारी प्रकार त्वरीत थांबला पाहिजे आणि आपल्या परीक्षांना मोकळा श्वास घेता आला पाहिजे.

**– प्रा. वैजनाथ महाजन**

# तामिळनाडूत कोणत्याही क्षणी निवडणुका?



## राजकारण

### मुख्यमंत्री विजय थलपती अल्पमतात; स्टॅलिन यांच्या वक्तव्याने खळबळ





तामिळनाडूत कोणत्याही क्षणी निवडणुका लागू शकतात, विजय सरकार कधीही कोसळू शकतं, अशा माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या वक्तव्याने खळबळ उडाली आहे. टीव्हीकेने कोणतेही काम केले नाही, तर केवळ सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांना प्रभावित करून निवडणुकीत विजय मिळवला, असा एम. के. स्टालिन यांनी आरोप केला आहे.

तमिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये मोठे यश मिळवून देखील चार ते पाच दिवसांच्या बैठका, चर्चा आणि गाठीभेटीनंतर विजय थलपती यांनी राज्यात सत्ता स्थापन केली, आणि मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. वास्तविक बहुमतासाठी ११८ संख्याबळाची असताना १२० अशा काठावर बहुमतात हे सरकार आहे.

त्यानंतर आता तामिळनाडूच्या राजकारणात मोठ्या उलथापालथीची शक्यता वर्तवली जात आहे. माजी मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी केलेल्या वक्तव्यानंतर या चर्चांना उधाण आले आहे, सी. जोसेफ विजय यांचे सरकार कधीही कोसळू शकते. यासोबतच त्यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना निवडणुकीसाठी तयार राहण्यास सांगितले आहे. सध्या, यावर 'तमिलगा वेत्री कळघम'च्या नेतृत्वाखालील आघाडीकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. यापूर्वी डीएमके आमदारांनीही दावा केला आहे की, सध्याचे सरकार ६ महिन्यांत कोसळेल.

एका हिंदी वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, स्टालिन यांनी आपल्या जिल्हा सचिवांना सांगितले आहे की, 'सध्याचे सरकार कधीही कोसळू शकते.' तसेच, 'पक्षाला कधीही निवडणुकीसाठी तयार राहावे लागेल.

हा पराभव तात्पुरता आहे. सध्याचे सरकार कधीही पडू शकते. तयार राहा. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसोबतच विधानसभा निवडणुकाही पुन्हा होऊ शकतात, अशी शक्यता आहे. आपण पुनरागमन करू आणि पुन्हा जिंकू', असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**डीएमकेला काय अपेक्षा आहे?**

#### पराभवाच्या विश्लेषणासाठी ३६ सदस्यीय समिती स्थापन

देशातील सर्वात चांगला कारभार असल्याबद्दल एम. के. स्टॅलिन यांच्या सरकारचा गवगवा होता. परंतु तामिळनाडूच्या जनतेने विधानसभा निवडणुकीत विजय थलपती यांना संधी दिली. त्यामुळे पराभवाच्या विश्लेषणासाठी डीएमकेने ३६ सदस्यांची एक समिती स्थापन केली आहे. स्टालिन यांनी या समितीकडून पराभवाच्या कारणांवर एक निष्पक्ष आणि स्पष्ट अहवाल मागवला आहे. त्यांनी शनिवारी समितीच्या सदस्यांना संबोधित करताना स्पष्ट केले की, हा सराव केवळ एक औपचारिकता नसून, पक्षाच्या निवडणुकीतील पराभवाची मूळ कारणे समजून घेण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. या पॅनेलला तामिळनाडूच्या सर्व २३४ विधानसभा मतदारसंघांमध्ये व्यापक अभ्यास करण्याचे आणि कार्यकर्ते व स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून थेट फीडबॅक घेण्याचे काम सोपवण्यात आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, जर सरकारला पाठिंबा देणारे व्हीसीके, सीपीआय, सीपीएम आणि आययूएमएल या पक्षांनी आपला पाठिंबा काढून घेतला, तर राजकीय अस्थिरता येऊ शकते. यासोबतच, जर तामिळनाडूचे स्पीकर किंवा न्यायालयाने एआयएडीएमकेच्या बंडखोर आमदारांना अपात्र ठरवले, तरीही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**सोशल मीडियाच्या माध्यमातून विजयाचा दावा**

स्टालिन यांनी दावा केला की, टीव्हीकेने कोणतेही काम केलेले नाही, तर सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांना प्रभावित करून तामिळनाडू विधानसभेसाठी २३ एप्रिल रोजी झालेल्या निवडणुकीत विजय मिळवला. स्टालिन यांनी पुन्हा टीव्हीकेचे नाव न घेता म्हटले की, मुलांच्या माध्यमातून कुटुंबातील सदस्यांना प्रभावित करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर केला गेला आणि 'हे आमच्या नजरेतून सुटले. डीएमकेला आता याची जाणीव झाली आहे आणि आतापासून पक्ष खूप सतर्क राहील. यासाठी पक्षाने सोशल मीडिया आधारित अशा प्रयत्नांना रोखण्यासाठी योजना आखल्या आहेत. माजी मुख्यमंत्री स्टालिन यांनी पुढे सांगितले की, १९४९ मध्ये स्थापन झालेल्या डीएमकेने अनेक निवडणूक विजय व पराभव पाहिले आहेत व पक्ष नेहमीच नव्या जोमाने पुनरागमन करत आला आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ अधिक ज्येष्ठ शके संवत्- १९४८
संवत्सर - पराभवनाम अयन- दक्षिणायण मास- अधिक ज्येष्ठ
ऋतु - सौर ग्रीष्म शुक्ल पक्ष तिथि : चतुर्थी ११:०७:००
नक्षत्र : आर्द्रा ०६:११:३७ नक्षत्र : पुनर्वसु २८:११:५२+
योग : शूल १४:०९:२९ करण:विष्टि ११:०७:०० करण : बव २१:४२:३२
सूर्य : वृषभ चन्द्र : कर्क २२:३८:३४ हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - जिल्हेज
तारीख - ३ विशेष

## राशी भविष्य...

**मेष** – आत्मविश्वास तसेच ध्यैर्यपूर्वक पुढे जावे. यश आवश्य मिळेल. वरिष्ठ लोकात प्रतिष्ठा वाढेल. व्यापार चांगला चालेल. आपल्या व्यसनावर स्वत:च नियंत्रण ठेवावे लागेल.

**वृषभ** – बुध्दिचातुर्याच्या जोरावर कार्यक्षेत्रात यश मिळेल. नव्या योजनांची शक्यता आहे. अधिक लोभ, कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहिल. आरोग्य चांगले राहिल.

**मिथून** – दिवस प्रतिकुल राहण्याची शक्यता आहे. सामाजिक स्तरातील परिवर्तन आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत चिंतीत रहाल. मानसिक अस्थिरता राहिल. व्यापार व्यवसाय मध्यम राहिल.

**कर्क** – आपली दुरदर्शीता आणि बुध्दिमत्तेनी काही रखडलेली कामे पूर्ण होतील. आपल्या आवडत्या व्यक्तिची भेट होऊ शकेल. व्यापारात लाभाची स्थिती राहिल. खर्च जरा जपून करावा.

**सिंह** – कार्यकुशलता आणि कार्यक्षमता वाढेल. आपसातील विचार विमर्श लाभदायक ठरतील. व्यापारात चांगली स्थिती राहिल. संपत्तिच्या देवाण-घेवाणीत सावधगिरी बाळगा.

**कन्या** – वाहन खरेदीचा योग राहिल. व्यापारात लाभ मिळेल. आपली स्थिती, योजनेच्या अनुरुप काम करा. कुटुंबात वाद होऊ शकतो. प्रयत्न केल्यानंतर अडकून पडलेली रक्कम मिळेल.

**तूळ** – योग्य मार्गदर्शन घ्यावे लागेल. कामकाजातील जिज्ञासा वाढेल. लक्षाला पूर्ण करण्यासाठी योग्य प्रयत्नांची गरज. आपल्या मनावर ताबा ठेंवा. व्यापार चांगला चालेल.

**वृश्चिक** – आपला व्यवहार आणि कार्यकुशलतेनी अधिकारी वर्गाला फायदा मिळेल. व्यापारात वाढ होईल. आपल्या जीवनसाथी बरोबर भावनिक समस्या उद्भवू शकते.

**धनू** – आर्थिक कामात इच्छित प्रगति न होण्याने मानसिक अशांतता राहिल. शत्रूच्या संख्येत वाढ होईल. प्रचार-प्रसारा पासून दुर रहा. कुटुंबात चांगले वातावरण राहिल.

**मकर** – शुभ कार्यात सामिल होण्याने यश आणि मान सन्मान मिळू शकेल. पयत्नांच्या तुलनेत लाभ अधिक प्रमाणात मिळेल. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करु नका.

**कुंभ** – व्यवहार चातुर्य आणि सहनशिलतेमुळे येणाऱ्या संकटातुन सुटका होईल. आपल्या कामाशी काम ठेवा. व्यापारात नविन योजना भविष्याच्या दृष्टिने लाभकारक ठरतील.

**मीन** – वेळेचा लाभ जास्तीत जास्त घ्यायला हवा. व्यापारात प्रगतिचे योग आहेत. आपल्या मुलातर्फे चांगली स्थिती राखण्यात येईल. खाण्या पिण्यात अनियमितता बाळगू नका.



## पारावरचा फड

पेट्रोल डिझेलच्या माध्यमातून आता सर्वच क्षेत्रात महागाईचा भडका उडू लागला आहे. दुसरीकडे जनतेला पेट्रोल-डिझेल टंचाईलाही समोर जावे लागत आहे. अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीची सूचना अगोदरच दिली आहे. वास्तविक यात सरकारचे यश-अपयश यावरून राजकारण तापू लागले तरी प्रत्यक्षात इंधनाच्या माध्यमातून येऊ घातलेले राष्ट्रीय संकट म्हणून याकडे बघणे काळाची गरज आहे. अनावश्यक वाहनांच्या माध्यमातून होणाऱ्या इंधन खपत कमी करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, सर्वच खरेदीवर होणारी उधळपट्टी वाचविणे ही एकप्रकारे स्वत:च्या आणि देशाच्या आर्थिक बचतीचा मार्ग आहे. शेतीमाल भरपूर उपलब्ध आहे, त्यातून सकस आहाराऐवजी फास्टफूडच्या चैनीला फाटा दिल्यास बचत आणि प्रकृतीही उत्तम राहू शकते, याची दखल घेणे म्हणजेच शेतकऱ्याला हातभार आहे. यासंदर्भात पारावरची चर्चा!

**बाबूराव :** त्या इरान-इसरायल आन् आमेरिकेचं युद्द पेटलंया आन् हिकडं समदीकडं डिजेल, पेटरोलचं वांदं हुवू लागलंया.

**बाबूराव :** खराय, मोदीसायबानं बचतीची साद घाटली, तिकडं इंदनाच्या निमतानं म्हागाईचा भडका उडाला.

**पांडूनाना :** आरं हे काय भारतातच न्हाय समद्या जगभरात हाय म्हनं.

**बाबूराव :** व्हय, मग बचत म्हंजे देशपरेम आसं मोदी भगत म्हनाय लागल्याती.

**पांडूनाना :** त्ये काय का आसंना, राजकारनाच्या पल्याड इचार कराय हावाच की. आरं इंदान वाडलं की समदं त्येच्या चाकावं पळतं म्हनून म्हागाई हुनारच की.

**बाबूराव :** तसं आसंल तर मग शेतकऱ्यास्नी बी दर वाडवून मिळाय हावाच की.

**पांडूनाना :** ते कसं, आपल्या मातीत पिकतंया त्येला काय किंमत हाय व्हय. तेच आयात केलं की म्हाग.

**बाबूराव :** आरं म्या तर म्हंतुया, काय ते पाव आन् बरगर म्हागलं तर मानुस मरतुया का?

**पांडूनाना :** आक्शी बराबर त्यापरास फळं, भाजी-भाकरी खा म्हनावं. त्या निमतानं बळीराजाला चार पैकं वाडून मिळत्याल. तब्येत बी सुदारल त्यातनं.

**बाबूराव :** आरं फासटफुड खायला सोकावल्याली पिडी त्येनास्नी कसं चालंल.


**पांडूनाना :** तिकडं म्हागड्या गाड्या कशापाई उडवाय हाव्यात. परदेशापरमानं हावं तर नो व्हेईकल डे साजरा करा म्हनावं समदीजन.

**बाबूराव :** ह्ये ढोंग करन्यापरास समद्यानं मनानं कराय हावं. सायकली काडा, पब्लिक टरान्पोरर्ट बेस चालंल.

**पांडूनाना :** व्हय, न्हायतर रिक्शावालं, बसेस बी चालत्याल. कारपोरेशनला बी पैकं मिळत्याल.

**बाबूराव :** लोका संगेपरास आपल्यापासनं करूया.


**बाबूराव :** होवू द्या जोमात! **– अमृत चौगुले**



## उपदेश कथा

एकदा वासुदेवानंद सरस्वती एका गावी गेले होते. गावातील एका सात्त्विक बाईने त्यांना विनंती केली की, 'महाराज, आज आपण आमच्या घरी यावे. 'स्वामी तिच्या घरी गेले. बरोबर आलेल्या लोकांशी संभाषण चालले होते. स्वयंपाकघरामध्ये त्या बाईने दूध गरम केले व एका चांदीच्या फूलपात्रामध्ये ओतले. दूध ओतताना त्यावरील साय भांड्यामध्ये पडली. त्याबरोबर तिच्या तोंडून 'अरेरे!' असे शब्द बाहेर पडले परंतु तिने त्यात साखर घातली आणि ते भांडे स्वामींसमोर आणून ठेवले. बराच वेळ झाला तरी स्वामीं दूध प्यायले नाहीत. बाईला वाटले की, दूध गरम असेल म्हणून स्वामींनी ते घेतले नाही पण संभाषण संपले आणि स्वामी परत जायला निघाले तेव्हा बाई म्हणाली, 'महाराज, आपण दूध का घेतले नाही.' स्वामी म्हणाले, 'नाही, मी ते पिऊ शकत नाही, कारण त्यामध्ये साय व साखर आहेच पण त्याबरोबर आणखी काही तरी मिसळले आहे.' बाई म्हणाली, 'छे, नाही महाराज. आणखी काही मिसळले नाही' तेव्हा स्वामी म्हणाले, 'त्यामध्ये अरेरे मिसळले आहे. ते दूध कसे घेऊ?'

**कथा उपदेश : साधु पुरुषांना माणसाची शुध्द अशुध्द भावना बरोबर कळते. तिला अनुसरून त्यांचे प्रत्यक्ष वर्तन घडते.**



## दिनविशेष...

**आंतरराष्ट्रीय**

२००६ – बगदादमधील स्फोटात १९ जण ठार झाले व ३६ जण जखमी झाले.

२००८ – मा यिंग यांची तायवानच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड करण्यात आली.

**राष्ट्रीय**


२००६ – कोकणात वऱ्हाडाचा ट्रक दरीत कोसळून ३२ ठार जण ठार झाले व ५० जण जखमी झाले.

२००७ – औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि जिल्हा देखरेख सहकारी संघ या दोन संस्थांमध्ये नोकर भरती घोटाळा प्रकरणी तात्कालीन चेअरमन माजी खासदार रामकृष्ण बाबा पाटील, माजी आ. नितीन सुरेश पाटील यांच्यासह बारा जणांना ॲण्टी करप्शन विभागाने अटक केली.

## चित्रपटांचेही मुलांवर संस्कार...

प्राचीन काळात लहान मुलांवर कसे संस्कार करायचे. यासाठी माध्यम नव्हते. म्हणूनच त्यावेळेस विचार यायचा. त्यामूळं शिक्षक नावाचा एक घटक निर्माण झाला की जो आपल्या लहान मुलांना योग्य काय आणि अयोग्य काय, ते समजावून सांगेल. तो सांगायचाही व त्यानुसार मुलं घडतंही. परंतु आज मात्र तसं नाही. आजचा शिक्षकच व्यसनाच्या आहारी गेलेला दिसतो. तो व्याभिचारात तल्लीन असलेला दिसतो. काही शिक्षक नावाचं व्यक्तीमत्व संस्थाचालक जेव्हा बनतो. तेव्हा तो पैसे खाण्यात लीन असतो. त्यामुळं शिक्षकांवर आजच्या काळात पाहिजे त्या प्रमाणात विश्वास ठेवता येत नाही. मग सुसंस्कार तर मुलांवर करायचे. त्याला मग नेमका मार्ग कोणता? आजच्या काळातील तो मार्ग आहे, चांगले चित्रपट दाखवणे. चांगले चित्रपट सतत दाखवल्यानं जे संस्कार विद्यार्थ्यांवर रुजू शकतील. ते संस्कार कधीच मिटणारे नसतील. परंतु आज ओबडधोबड चित्रपटं निर्माण केली जात आहेत. परंतु याकडे न पाहता चित्रपट निर्मात्यानं वा दिग्दर्शकानं केवळ पैसा कमवता यावा म्हणून ओबडधोबड चित्रपटं काढू नयेत. कारण सुसंस्कारही महत्वपूर्ण असतात. त्यामुळं असेच चित्रपटं काढावेत की जे लहान लहान मुलांवर सुसंस्कार करतील.

**वैशाली कांबळे, सांगली**



## जन की बात...

### जनतेला काटकसरीचा सल्ला सत्ताधाऱ्यांच काय?

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधन, गॅस, खाद्यतेलाचा जपून वापर करण्याचे तसेच परदेश प्रवास आणि सोन्याची खरेदी टाळण्याचे आवाहन केल्याच्या चर्चांवरून अनेक प्रश्न सामान्य जनतेच्या मनात निर्माण होत आहेत. देश आर्थिक अडचणींचा सामना करत असताना जनतेला काटकसरीचे धडे दिले जात आहेत, मात्र त्याच वेळी सत्ताधाऱ्यांचे रोडशो, मोठमोठे वाहनताफे, फुलांची उधळण आणि प्रचंड जाहिरातबाजी सुरूच असल्याचे चित्र दिसते. त्यामुळे त्याग फक्त जनतेनेच करायचा का? हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

जर देशात खरोखरच तेल, पैसा आणि संसाधनांची कमतरता असेल, तर सर्वप्रथम सरकार आणि मंत्रीमंडळाने स्वतः उदाहरण घालून द्यायला हवे. एका मंत्र्याच्या किंवा मोठ्या नेत्याच्या मागे धावणाऱ्या अनेक गाड्या, सुरक्षा ताफे, हेलिकॉप्टर दौरे, रोडशो यावर होणारा खर्च हा सामान्य माणसाच्या नजरेतून सुटत नाही. जनतेला डिझेल, पेट्रोल वाचवण्याचा सल्ला देताना स्वतः मात्र शेकडो वाहनांचा ताफा घेऊन फिरणे, हा दुहेरी मापदंड वाटू शकतो. सरकार नागरिकांना मेट्रोने प्रवास करण्यास, सार्वजनिक वाहतूक वापरण्यास आणि साधेपणा स्वीकारण्यास सांगते. मग देशाचे मंत्री, खासदार आणि वरिष्ठ नेते यांनीही आपल्या ताफ्यात कपात करून साधेपणाचा आदर्श निर्माण करायला हवा. लोकप्रतिनिधींनी स्वतः काटकसरीचा मार्ग स्वीकारला, तर जनतेलाही त्याग करण्याची प्रेरणा मिळेल. अन्यथा हे सर्व फक्त उपदेशापुरतेच मर्यादित राहते. आज सामान्य नागरिक आधीच महागाई, बेरोजगारी, वाढते कर, इंधन दरवाढ आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींनी त्रस्त आहे. दुसरीकडे मोठमोठ्या उद्योगपतींची हजारो कोटींची कर्जे माफ केली जातात, असा आरोप वारंवार केला जातो.

भ्रष्टाचारमुक्त भारताचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजही अनेक स्तरांवर भ्रष्टाचार, घोटाळे, दलाली आणि सत्तेचा गैरवापर याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे सरकारने केवळ विरोधकांवर दोषारोप न करता स्वतःच्या कारभाराचाही प्रामाणिकपणे आढावा घेणे आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये जनता सर्व पाहत असते. जनतेला त्याग शिकवायचा असेल, तर सत्ताधाऱ्यांनी प्रथम स्वतः तो आचरणात आणला पाहिजे. अन्यथा लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः मात्र कोरडे पाषाण ही म्हण खरी ठरल्याशिवाय राहणार नाही.

**–विजय वाठोरे, मुंबई**

## बाल गुहेगारीला आळा घाला

अलिकडील काळात गुन्हेगारी वाढत आहे. मुलं सरकारी शाळेत शिकायला तयार आहेत. परंतु त्यांचे आईवडील हे सरकारी शाळेत शिकवायलाच तयार नाहीत. ते शिकवितात कॉन्व्हेंट शाळेत. ज्यात काही दिवसांनी पालकांची परिस्थिती नाजूक होते. कारण सर्वांची परिस्थिती ही सार्वकालिक सारखीच असते, असं नाही. मग त्या मुलांना जास्त न शिकवता जेव्हा पालकाची परिस्थिती वाईट येते. त्यावेळेस पालक त्यांना कॉन्व्हेंट शाळेतून सरकारी शाळेत आणून टाकतो. त्यावेळेस सरकारी शाळेत मुलांचं मन रमत नाही. अशा सरकारी शाळेत शिकवली जाणारी भाषा त्यांना नीट कळत नाही. थोडीफार समजदार असली की अशी मुलं शाळेत जायला पाहात नाहीत वा जात नाहीत. कॉन्व्हेंट शाळेवाले त्याचे शाळा सोडण्याचे दाखले देत नाहीत. मग शिक्षण सुटतं. अशातच ती मुलं शाळा सोडतात. ती मुलं शाळाबाह्य होतात व वाम मार्गाकडे वळतात. खुनं मारामारी, चोऱ्या हा त्यांचा नित्याचाच व्यवहार असतो. महत्वपुर्ण बाब ही की आज ज्या शाळेनं संस्कार करायला हवेत बालकांवर, त्यांच्या लहानग्या वयापासून. त्याच शाळेतील मुलं सातवी आठवीत गेली की बस. बिघडून एकमेकांवर हल्ले करतांना बऱ्याच शाळेत दिसतात. हे कधीकधी आपण वर्तमानपत्रातून वाचत असतोच. ही एवढी निडरता व हिंमत कुठून येते? याचा अभ्यास केल्यास सहजच लक्षात येतं की ही निडरता व हिंमत येते कुठून याचा विचार करून त्यावर निर्बंध घालणे गरजेचे आहे.

**– पुष्पा माने, सांगली**

# पुणे कृषि हॅकथॉन २०२६ मध्ये राहुरी विद्यापीठाचा डंका

## संवेदक आधारित नत्र फवारणी यंत्राला राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक; २५ लाखांचा मानाचा पुरस्कार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** कृषि विभाग महाराष्ट्र शासन आयोजित पुणे कृषि हॅकथॉन २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी उल्लेखनीय यश संपादन करत कृषि यांत्रिकीकरण विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विद्यापीठाने विकसित केलेल्या संवेदक आधारित ताण विशिष्ट नत्र फवारणी यंत्र या अत्याधुनिक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रुपये २५ लाखांचे प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले.

या यशामुळे महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या संशोधन कार्याची राज्यभर दखल घेतली जात असून स्मार्ट आणि अचूक शेतीच्या दिशेने विद्यापीठाने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. सदर पुरस्कार संशोधक टीमचे सदस्य डॉ. अवधूत वाळुंज यांनी स्वीकारला.या प्रकल्पाच्या संशोधक टीममध्ये डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी डॉ. प्रणव पावसे आणि इंजि. भूमिका पांडे यांचा समावेश आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे




कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून साकार झाला असून प्रकल्पासाठी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी मार्गदर्शक म्हणून मोलाचे योगदान दिले.

या प्रकल्पासाठी विद्यापीठातील स्मार्ट आणि अचूक शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान उत्कृष्टता केंद्र येथील आधुनिक संवेदक सुविधांचा वापर करण्यात आला. विकसित करण्यात आलेल्या या यंत्राद्वारे पिकांच्या गरजेनुसार आणि ताणस्थितीनुसार आवश्यक त्या भागातच मोजून-मापून नत्राची फवारणी करता येणार आहे. परिणामी नत्रयुक्त खतांचा अपव्यय टाळून संतुलित खत व्यवस्थापन शक्य होणार आहे.

या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचा खतांवरील खर्च कमी होण्यास मदत होणार असून उत्पादन खर्चात बचत होईल. तसेच रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर कमी झाल्याने पर्यावरण संरक्षणालाही हातभार लागणार आहे. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, संवेदक तंत्रज्ञान आणि डिजिटल शेतीचा प्रभावी वापर करून शाश्वत शेतीच्या दिशेने हे तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे तसेच विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी विजयी संशोधक टीमचे विशेष अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अक्षरसृष्टी संस्थेच्या माध्यमातून ५०० दिव्यांग बांधवांना रेशनिंग किट वितरण

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुरंदर :** अक्षरसृष्टी संस्था चे अध्यक्ष सिद्धनाथ पवार यांच्या माध्यमातून पुरंदर, बारामती व दौंड तालुक्यातील सुमारे ५०० दिव्यांग बांधवांना डोनेट कार्ड संस्था यांच्या सहकार्यातून रेशनिंग किटचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

समाजातील वंचित घटकातील सर्वसामान्य नागरिकांना मदतीचा हात देण्याचे कार्य अक्षरसृष्टी संस्था सातत्याने करत असून, विविध सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंपर्यंत मदत पोहोचवली जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमाला मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते. रेशनिंग किट वाटपामुळे लाभार्थींनी संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी अशाच प्रकारचे उपक्रम पुढील काळातही राबविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी



दिली.यावेळी डाळिंबाचे सरपंच बजरंग मस्के, काळ खैरेवाडी चे सरपंच तुषार कुतवळ, पिंगोरी चे सरपंच संदीप यादव, पांडेश्वर च्या सरपंच सविता नाळे, सिंगापूरचे उपसरपंच विक्रांत पवार, नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर, माजी मुख्याध्यापिका रोहिणी कामथे,नायगावचे माजी उपसरपंच किशोर खळदकर, सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टचे राहुल कड,सामाजिक कार्यकर्ते महेश कोलते,भाऊसाहेब कड,चंद्रकांत कड,रविंद्र जाधव, संभाजी देवकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अक्षरश सृष्टी संस्था व सामाजिक कार्यकर्ते रियाज सय्यद यांनी केले.

# मंगलाताई कदम यांची राष्ट्रवादी पक्षामधून हकालपट्टी करा : रवींद्र ओव्हाळ

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्याकडे पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी झोपडपट्टी सेलचे अध्यक्ष रवींद्र ओव्हाळ यांनी माजी महापौर मंगलाताई कदम यांची पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी केली आहे. सोमवारी मंगलाताई कदम यांचा एक कथित व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाला आहे. यामध्ये त्यांनी मागील काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षविरोधी काम केल्याची अप्रत्यक्षरीत्या कबुली दिली आहे. नुकत्याच झालेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीमध्ये त्यांनी त्यांच्या मुलाला भाजपाची उमेदवारी मिळवून देऊन जाहीरपणे प्रचार केला आहे. याची पक्षप्रमुख म्हणून सुनेत्रा अजितदादा पवार यांनी गंभीर दखल घेऊन मंगलाताई कदम यांच्यावर बडतर्फीची कारवाई करून त्यांची पक्षातून त्वरित हकालपट्टी करावी अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे. या पत्रावर खजिनदार दीपक साकोरे, सेवादल शहराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय अवसरमल, पदवीधर सेल अध्यक्ष प्रदीप औटी आणि वाहतूक सेल अध्यक्ष विनोद वरखेडे यांनी देखील सह्या केल्या आहेत, तसे पत्र रवींद्र ओव्हाळ यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

# पिसर्वे-राजुरी पुलावरील खड्डे बुजविल्याने प्रवासी समाधानी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुरंदर :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील पिसर्वे ते राजुरी रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण काम पूर्ण झाले असले, तरी मुख्य रस्त्यावरील पुलाच्या ठिकाणी मोठ्या खड्ड्यांचा गॅप निर्माण झाल्याने वाहनचालकांसाठी गंभीर धोका निर्माण झाला होता. या ठिकाणी वारंवार लहान-मोठे अपघात घडत होते.

पुलावरून जाताना वाहनांना अचानक धक्का बसत असल्याने अनेक वाहनचालकांचे संतुलन बिघडून अपघात घडत होते. तसेच, या ठिकाणी कोणतीही सूचना फलक किंवा इशारे नसल्यामुळे अपघातांचा धोका



अधिक वाढला होता. अनेक वाहनचालकांना किरकोळ दुखापतीही झाल्या होत्या.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नायगाव विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. यावेळी रस्त्याच्या कामावर देखरेख ठेवणारे रमेश साबळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुलावरील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी करण्यात आली. या भेटीत राजुरीचे माजी उपसरपंच विपुल भगत तसेच सामाजिक कार्यकर्ते सत्यवान भगत उपस्थित होते.

मागणीची दखल घेत साबळे यांनी दुसऱ्याच दिवशी पुलावरील खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून गॅप बुजविण्याचे काम केले. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.


> पुलावरील खड्ड्यांचा गॅप बुजविल्याने प्रवाशांचा त्रास कमी झाला आहे. यासाठी अनेक वेळा पाठपुरावा केला होता. मात्र, अजूनही या ठिकाणी अधिक दर्जेदार आणि कायमस्वरूपी काम होणे गरजेचे आहे.
> – चंद्रकांत चौंडकर, अध्यक्ष, नायगाव विविध कार्यकारी सोसायटी

# पुण्यात 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड'चा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** पुरुषांच्या मानसिक आरोग्याबाबत जागृती निर्माण करणे तसेच प्रोस्टेट कॅन्सर संशोधनासाठी निधी संकलन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड' (ऋ) स्नेहमेळावा नुकताच पुण्यात उत्साहात पार पडला. पाषाण येथील ट्रायम्प – बी.यू. भंडारी मोटारसायकल शोरूमपासून सुरू झालेल्या या काकर्यक्रमाचा समारोप कल्याणी नगर येथील 'कायरोस रेस्टॉरंट'मध्ये झाला.

जगभरात एकाच दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमात पुण्यातील तब्बल २८० रायडर्स सहभागी झाले होते. क्लासिक आणि कस्टम



मोटारसायकलींसह रायडर्सनी आकर्षक 'डॅपर' पेहरावात सहभाग नोंदवत शहरातील विविध भागांतून एकत्र येत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. पुरुषांच्या आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्याबरोबरच जबाबदार आणि शिस्तबद्ध मोटरसायकलिंगचा संदेशही या राईडमधून देण्यात आला. 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड' या जागतिक उपक्रमाची सुरुवात २०१२ मध्ये ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे मार्क हव्वा यांनी केली. 'चरव चशप' मालिकेतील डॉन ड्रेपर या पात्रापासून प्रेरणा घेत ही संकल्पना साकारण्यात आली. आज हा उपक्रम ११५ देशांपर्यंत पोहोचला असून आतापर्यंत ३ लाख ४० हजारांहून अधिक रायडर्सनी सहभाग घेत ३.१६ कोटी अमेरिकी डॉलरहून अधिक निधी उभारला आहे. पुण्यातील कार्यक्रमाचे आयोजन 'डीजीआर २०२६ होस्ट आणि रेडॉन रायडर्सचे संस्थापक' डॉ. किशोर शिंदे, ट्रायम्प – बी.यू. भंडारीचे राजेश वर्मा तसेच डीजीआर २०२६ होस्ट व रेडॉन रायडर्स कोअर कमिटी सदस्य ॲड. नरेश शेळके यांनी केले. बजाज इंडियाच्या रितिका लहिरी यांनी मोटरसायकलिंग आणि डीजीआर संदर्भातील महत्त्वपूर्ण सूचना व माहिती दिल्यानंतर पाषाण येथून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे अधिकृत मीडिया पार्टनर रेड एफएम ९८.३ होते. रेड एफएमचे आरजे बंड्या यांनी उपस्थित राहून रायडर्सशी संवाद साधला. कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून सच्चिदानंद मेंटल हेल्थ अँड काउन्सलिंग सेंटरचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रसन्न फुटाणे आणि 'श्री बाईक पॉइंट'चे इंजिनिअर प्रसाद बापट उपस्थित होते.

# जीवनातील आईचे योगदान अविस्मरणीय : ज्येष्ठ साहित्यिका चंद्रलेखा बेलसरे यांचे मत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** . आई ही आपल्या आयुष्यातील पहिला गुरू असते. दिवस रात्र राबून,स्वत: झिजून आपल्या पाल्यांसाठी जीवाचे रान करते.आपण आयुष्यभर आईसाठी कितीही केले तरी तिचे उपकार फिटत नाहीत,असे मत ज्येष्ठ साहित्यिका मा.चंद्रलेखाताई बेलसरे यांनी व्यक्त केले.

अपेक्षा मासिक परिवार, पुणे यांच्या वतीने स्व.सौ.उर्मिलाताई कराड यांच्या जयंतीचे औचित्य साधून "स्व. सौ.उर्मिलाताई कराड आदर्श



माता पुरस्कार " प्रदान समारंभ वेदशास्त्रोतेजक सभागृह येथे संपन्न झाला. यावेळी अपेक्षा मातृसेवा विशेषांकाचे प्रकाशन आणि निमंत्रित कवींच्या कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समाजसेविका देवयानीताई वैदानकर, सौ.मीनाताई सत्यशील नाईक, मायाताई प्रभूणे व श्री.रामहरी कराड-रुईकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# कॅसाग्रँडने पुण्यात एक वर्ष पूर्ण केले असून पुढील विस्ताराची योजना

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** आघाडीची रिअल इस्टेट कंपनी कॅसाग्रँडने पुण्यातील आपल्या कामकाजाचे एक वर्ष पूर्ण केले असून, पश्चिम भारतातील विस्ताराच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. २०२५ मध्ये पुणे बाजारपेठेत प्रवेश केल्यानंतर कंपनीने अप्पर खराडी जवळ 'कॅसाग्रँड कॅलॅडियम' हा प्रकल्प सुरू करून शहरात मजबूत ओळख निर्माण केली आहे. या प्रकल्पाद्वारे शहराच्या सातत्याने विकसित होत असलेल्या गृहनिर्माण क्षेत्रात प्रशस्त घरे, आधुनिक सुविधा आणि उत्तम जीवनशैली देणारे निवासी प्रकल्प उभारण्यावर कंपनीचा भर असल्याचे दिसून येते. पहिल्याच वर्षात या प्रकल्पातील अनेक फ्लॅट्स विकले गेले आहेत.

या खास निमित्ताने कॅसाग्रँडने विशेष वर्धापनदिन ऑफरही जाहीर केली आहे. या ऑफर अंतर्गत घरखरेदीदारांना २ बीएचके फ्लॅट खरेदीवर ७.५ लाखांपर्यंत आणि ३ बीएचके फ्लॅट खरेदीवर १० लाखांपर्यंत सूट मिळणार आहे.

# नॉर्वे दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या शिष्टमंडळात 'ग्रीनएक्स'च्या आरती भोसले-अहिवळे यांची निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** . भारत-नॉर्वे ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप समिटमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्योग प्रतिनिधी मंडळातील टॉप २० प्रतिनिधींमध्ये पुण्यातील ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटलच्या संस्थापक व व्यवस्थापकीय संचालिका आरती भोसले-अहिवळे यांची निवड झाली आहे. ऑस्लो येथे १८ आणि १९ मे रोजी झालेल्या या परिषदेत त्यांनी ईएसजी नेतृत्व आणि शाश्वत विकास या विषयावर भाषण केले. ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल ही संस्था ईएसजी कन्सल्टिंग, सस्टेनेबिलिटी



रिपोर्टिंग, कार्बन फूटप्रिंटिंग, लाइफ सायकल असेसमेंट आणि पर्यावरणीय अनुपालन या क्षेत्रांत कार्यरत आहे. तसेच नॉर्वेतील ईपीडी ग्लोबल या आंतरराष्ट्रीय संस्थेची भारतातील 'लीगल बिझनेस पार्टनर' म्हणूनही संस्था कार्य करते.

पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि प्रशासन (ईएसजी), हवामान बदल, हरित औद्योगिक परिवर्तन आणि शाश्वत आर्थिक विकास या विषयांवर या परिषदेत चर्चा झाली. परिषदेला नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गाहर स्टोरे यांच्यासह दोन्ही देशांतील वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग प्रतिनिधी उपस्थित होते. भारताकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल सहभागी झाले होते. दोन्ही पंतप्रधानांसह आयोजित विशेष मेजवानीसाठीही आरती भोसले निमंत्रित करण्यात आले होते.

# लेखी आश्वासनानंतर फुलडाळे यांनी उपोषण सोडले

## शहरात दिशादर्शक फलक लावण्याची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** शिरूर शहराच्या विविध भागात दिशादर्शक फलक लावावेत; तसेच शहरातील महत्वाच्या गल्लीबोळांना नावे देऊन तसे नामफलक लावावेत, यासाठी पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने सामाजिक कार्यकर्ते प्रीतेश फुलडाळे यांनी सोमवारी नगर परीषद मंगल कार्यालयासमोर उपोषण सुरू केले.दरम्यान, या मागण्यांबाबत अंमलबजावणी केली जाईल, असे लेखी आश्वासन नगर परिषदेने दिल्यानंतर फुलडाळे यांनी रात्री उशीरा उपोषण सोडले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते नीलेश वाळूंज, भाजप महिला आघाडीच्या शहर अध्यक्षा प्रिया बिरादार, शिरूर तालुका मुद्रक संघाचे अध्यक्ष बाबूराव पाचंगे, मनसेचे माजी शहर अध्यक्ष संदीप कडेकर, अविनाश घोगरे, शिरूर तालुका कुंभार समाज संघटनेचे अध्यक्ष योगेश जामदार, ॲड.माया गायकवाड, डॉ.वैशाली साखरे, सुधीर कडेकर, कलिम सय्यद, राजेंद्र शहाणे, सृष्टी करंजुले, सोहेल शेख आदी यावेळी उपस्थित होते.

> दरम्यान, सायंकाळी उशीरा नगर परिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती सुनील जाधव,स्वच्छता समितीचे सभापती एजाज बागवान, महिला व बालकल्याण समिती उपसभापती स्वप्नाली जामदार,नगरसेवक सागर नरवडे यांनी आंदोलक फुलडाळे यांच्याशी त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा केली.नगर अभियंता समाधान मुंगसे यांनी, १२ मे ला झालेल्या सर्वसाधारण सभेत शहराच्या विविध भागात दिशादर्शक फलक लावण्याबाबतचा ठराव झाला असून, त्याबाबत अंमलबजावणी केली जाईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर फुलडाळे यांनी उपोषण सोडले.



शिरूर शहर ही तीन तालुक्यांची बाजारपेठ असून, दिवसेंदिवस शहर व परिसरातील लोकसंख्या वाढत आहे. बाहेरगावचे लोक येथे वास्तव्यास असून, दैनंदीन कामांसाठी बाहेरगावच्या लोकांचा येथे रोज राबता असतो. नवीन लोकांना सरकारी दवाखाना, पोलिस ठाणे, तहसिलदार कार्यालयासह शासकीय कार्यालये, शाळा, कॉलेज, बसस्थानक, पोस्ट ऑफीस, अमरधाम, कब्रस्तान, दशक्रिया विधी घाट व धार्मिक स्थळांच्या ठिकाणी जाण्यासाठी अडचणी येतात.

माहिती नसल्याने त्यांची कुचंबणा होते. त्यासाठी शहराच्या विविध भागात मार्गदर्शकपर दिशादर्शक फलक गरजेचे आहेत, असे फुलडाळे यांनी सांगितले. हे फलक लावावेत व शहरातील विविध चौक, रस्त्यांना दिलेल्या नावाच्या पाट्या जुन्या झाल्याने त्या बदलून नव्या लावाव्यात यासाठी नगर परिषदेकडे गेल्या पाच वर्षांपासून पत्रव्यवहार केला असून, त्याअनुषंगाने सातत्यपूर्ण पाठपुरावा देखील केला आहे. मात्र, पत्रांना उत्तर सुद्धा नगर परिषद प्रशासनाकडून न मिळाल्याने या महत्वाच्या विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी उपोषणाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षीप्त वृत्त

### हिंदी जनरल एंटरटेनमेंट वाहिनी क्षेत्रात झी टीव्हीचा दबदबा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** झी टीव्हीने हिंदी जनरल एंटरटेनमेंट वाहिनी (GEC) क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करत ह्या वाहिनीवरील 'वसुधा' आणि 'गंगा माई की बेटियाँ' या दोन मालिकांनी टीव्हीवरील अव्वल रेटिंग मिळवणाऱ्या कार्यक्रमांमध्ये स्थान मिळवले आहे. 'वसुधा' ही मालिका सलग दुसऱ्या आठवड्यात २.० टीव्हीआरसह क्रमांक एकवर कायम असून 'गंगा माई की बेटियाँ'ने १.७ टीव्हीआरसह दमदार कामगिरी करत प्रेक्षकांमध्ये झी टीव्हीच्या कथाकथनाबद्दल वाढत असलेले प्रेम दर्शवले आहे.

### मा.सभापती पवार यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार




■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनेवाडी तालुका कोपरगाव शताब्दी महोत्सव सोहळ्यानिमित्त टाकळीभान येथील माजी सभापती नानासाहेब पवार यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार देऊन नूकतेच सन्मानित करण्यात आले. ह. भ. प. उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते नानासाहेब पवार यांना हा पुरस्कार देण्यात आला. नितीन भाऊ ओताडे, राघवेश्वर महाराज, राजेश परजने, नानासाहेब तुवर, रमेश धुमाळ, चित्रसेन रणवरे, राहुल पटारे, अविनाश लोखंडे, शिवाजी धुमाळ,शंकरराव शिंदे, बाळासाहेब शेळके, अशोक धोत्रे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### एअरटेलने 'प्रायोरिटी पोस्टपेड' सेवा सुरू केली – ग्राहकांना उत्कृष्ट नेटवर्क अनुभवाचा लाभ

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** भारती एअरटेलने आज 'प्रायोरिटी पोस्टपेड' ही नवी सेवा सुरू करण्याची घोषणा केली. ही सेवा ५जी स्लायसिंग तंत्रज्ञानाचा वापर करून पोस्टपेड ग्राहकांना उत्कृष्ट आणि सातत्यपूर्ण नेटवर्क अनुभव प्रदान करते. काम, मनोरंजन किंवा ऑनलाइन सहयोगासाठी अखंड कनेक्टिव्हिटीवर अवलंबून असलेल्या व्यस्त ग्राहकांसाठी ही सेवा विशेषत: विकसित करण्यात आली आहे.

या सेवेसाठी एअरटेलने आपल्या ५जी नेटवर्कमध्ये स्लायसिंग तंत्रज्ञानाच्या प्रगत क्षमतांसह सुधारणा केली आहे. यामुळे नेटवर्क अधिक कार्यक्षम बनते; अधिक क्षमता निर्माण होते; तसेच ही क्षमता विशिष्ट पद्धतीने वापरून प्रायोरिटी ग्राहकांना उत्कृष्ट अनुभव देणे शक्य होते. नेटवर्क क्षमतेचे बुद्धिमत्तापूर्ण आणि गतिशील विभाजन करून, एअरटेल उच्च ट्रॅफिकच्या परिस्थितीतही पोस्टपेड ग्राहकांना स्थिर, विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण अनुभव देत आहे.

### तुमची आवडती 'गायनॅक' पुन्हा ड्युटीवर हजर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** हलक्याफुलक्या विनोदामुळे, सहज जोडून घेता येणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे आणि आधुनिक स्त्रीजीवनाकडे प्रामाणिकपणे पाहणाऱ्या कथानकामुळे प्रेक्षकांची पसंती मिळवलेली 'हू'ज युवर गायनॅक?' ही लोकप्रिय कॉमेडी–ड्रामा मालिका आता नव्या सीझनसह परतत आहे. भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात–आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज या बहुप्रतीक्षित दुसऱ्या सीझनचा ट्रेलर सादर केला. या नव्या सीझनमध्ये डॉ. विदुषी कोठारी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, अनेक वर्षांपासून ज्या आयुष्याचे स्वप्न ती पाहत होती, त्या नव्या टप्प्याकडे तिची वाटचाल सुरू होताना दिसणार आहे. द व्हायरल फीव्हर (टीव्हीएफ) आणि गर्लियापा निर्मित या मालिकेत सबा आझाद पुन्हा प्रमुख भूमिकेत दिसणार असून, करिश्मा सिंह आणि आरॉन अर्जुन कौल यांच्यासह ही कथा जिथे थांबली होती, तिथूनच पुढे सरकणार आहे. हिमाली शाह दिग्दर्शित या नव्या सीझनमध्ये कुणाल ठाकूर, विभा छिब्बर आणि श्रुती सेठ यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. २२ मे रोजी प्रदर्शित होणारा 'हू'ज युवर गायनॅक?' सीझन २मधून रुग्णांसाठी, मित्रांसाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वत:साठी उभे राहण्याची भावनिक आणि प्रेरणादायी कथा प्रेक्षकांसमोर सादर करण्यात येणार आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत त्रिमूर्ती विद्यालयाचे उल्लेखनीय यश

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** त्रिमूर्ती माध्यमिक विद्यालय घोगरगाव येथील शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता ५ वी मधून दहातोंडे कृष्णा अशोक, भोसले आराध्या दादासाहेब, कावळे युवराज बळीराम, काळे रुद्र बाळू, मेघळे आयुष परसराम, डुबे आदर्श केशव, शेळके यश आबासाहेब, गवारे शिवम संदीप, बनसोडे आराध्या गोकुळ, पठाडे परी संदीप व चेडे राजीव आदिनाथ हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

तसेच इयत्ता ८ वी मधून कुंभार समर्थ दिलीप, ठेंग ईश्वरी दत्तात्रय, डिके भक्ती पांडुरंग, शेळके प्राची आबासाहेब, बारवाल यश शरदसिंग, कोल्हे सायली नवनाथ, कणगरे तन्वी अरुण, पवार श्रद्धा दादासाहेब, लोखंडे श्रावणी सचिन, थोरात गौरव गजानन, मेघळे तृप्ती परसराम व चौधरी अथर्व शिवाजी यांनी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना शिक्षक मनेष वेताळ, हरिश्चंद्र डिके, रेखा दिवे, संभाजी गारुळे, संदीप काळे, विकास कौटे, संदीप कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले असून

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुमतीताई घाडगे, उपाध्यक्षा सौ. स्नेहल घाडगे, विश्वस्त चेतन चव्हाण पाटील, विद्यालयाचे प्राचार्य संतोष जावळे, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, पालक व घोगरगाव ग्रामस्थांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

# राहुरी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये ट्रॉलीमध्ये खुल्या कांद्याचा लिलाव पद्धत सुरू करावा : शिवसेना शेतकरी सेना

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये ट्रॉली मध्ये खुल्या कांद्याचा लिलाव पद्धत सुरू करवा, तसेच कमीत कमी दोन हजार रुपये प्रति क्विंटलने कांदा खरेदी करावा, आदि मागण्यांसाठी शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

शिवसेना शेतकरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपूरे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, कांदा उत्पादक शेतकरी कांद्याचे दर अतिशय कमी असल्या कारणाने संकटात सापडलेला आहे. त्या कांद्याला उत्पादनासाठी केलेला खर्च निघने सुद्धा मुश्किल झाले आहे. त्यात जुट गोणी बारदाण्याचे प्रचंड मोठ्या प्रमाणात भाव वाढले. शेतकऱ्याला ते घेणं आता परवडत नाही. म्हणून राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ट्रॉलीमध्ये खुल्या कांद्याचा लिलाव पद्धत सुरू करण्यात यावी. जेणेकरून व्यापाऱ्यांना कांदा बघून घेता येईल.

तसेच तात्पुरत्या स्वरूपात जुटची गोणी न वापरता प्लॅस्टिकच्या गोणीत



कांदा मार्केटला आणायला परवानगी द्यावी. तसेच बाजार समितीमध्ये कांदा विक्रीसाठी घेऊन आल्यावर काही आडते ते स्वत: खरेदी करतात. शेतकऱ्यांच्या विक्री पट्टीवर खरेदीदार व्यापाऱ्यांचे नाव यायला हवे.

तसेच तहसीलदार अमित पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, कांदा उत्पादक शेतकरी अतिशय संकटात सापडलेला आहे. कांद्याचे प्रचंड मोठ्या प्रमाणात भाव पडल्यामुळे शेतकऱ्याचा उत्पन्न खर्चही निघणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे शासनाने फेडरेशनच्या माध्यमातून १ हजार २३५ ने कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. तो अतिशय कमी आहे. कमीत कमी कांद्याला दोन हजार रुपये प्रति क्विंटल ने खरेदी करण्यात यावी. तर शेतकऱ्यांना थोडाफार काही दिलास मिळेल. तसेच कांद्याला प्रतिक्विंटल १ हजार रुपये अनुदान देण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोंढे, शहराध्यक्ष जालिंदर मुसमाडे, सुनिल सिनारे, संदिप शिरसाठ, सुनील ढूस, सोन्याबापू भांगरे, प्रवीण मकासरे, भास्कर कोळसे, श्रीकांत यादव, काशिनाथ तारडे, कारभारी खुळे, बाळासाहेब म्हसे, अनिकेत कुलकर्णी आदिंच्या सह्या आहेत.

## साखर निर्यात बंदीचा निर्णय ऊस उत्पादक शेतकऱ्याचा विश्वासघात करणारा : विठ्ठलराव शेळके

■ जनप्रवास प्रतिनिधी


**राहाता :** केंद्र सरकारचा साखर निर्यात बंदीचा निर्णय ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वासघात करणारा असल्याचे मत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शेळके यांनी व्यक्त केले आहे.

प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात शेळके यांनी म्हटले आहे की केंद्र सरकारने कांदा, सोयाबीन, कापूस ,तुर ,हरभरा, दूध या शेतमालाची निर्यात बंदी करून शेतकऱ्यांना आर्थिक संकटात पाडण्याचे पाप अगोदरच केले आहे.कुठल्याही शेतमालाला उत्पादन खर्चाच्या निम्मा भाव देखील मिळत नाही.आता साखरेची निर्यात बंदी केल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना येणाऱ्या गळीत हंगामात या निर्णयाचा फटका बसणार आहे .दोन पैसे शेतकऱ्यांना मिळायला लागले तर निर्यात बंदी करून शेतमालाचे भाव पाडले जातात. राज्यातील अनेक साखर कारखाने हे शेतकऱ्यांची लूट करत आहेत .काही कारखाने काटा मारतात. कधी रिकव्हरी (साखर उतारा) चोरून शेतकऱ्यांचे शोषण केले जाते.शिवाय साखर कारखानदार बाय प्रॉडक्ट उत्पादनाचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हिशोब देत नाही.ऊस उत्पादनासाठी मशागत, रासायनिक खते ,कीटकनाशके, मजुरी यांचे दर चारपट वाढले आहे.सध्या जागतिक बाजारपेठेत साखरेला चांगली मागणी आहे. साखर निर्यात केली तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पुढील ऊस गळीत हंगामात चांगला भाव मिळेल.साखर निर्यात बंदी करणे हे मूर्खपणाचे लक्षण आहे.शेतकरी संघटनेप्रमाणे साखर कारखानदार यांनी या साखर निर्यात बंदीला विरोध करावा असेही पत्रकार शेळके यांनी म्हटले आहे

## विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार विवेक कोल्हे यांचा नागरी सत्कार

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार विवेक कोल्हे यांचा येथे शुक्रवारी ( दि, २२) भव्य नागरी सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष सुधाकर जाधव यांनी दिले



दरम्यान, विवेक कोल्हे यांची विधान परिषदेचे आमदार म्हणून निवड व्हावी यासाठी येथील ग्रामदैवत कालभैरवनाथांना यात्रा काळात कार्यकर्त्यांनी साकडे घालून पेढे तुला करण्याचा नवस केला होता, कोल्हे यांची आमदार म्हणून निवड झाल्याने नवस्फूर्ती झाली असून शुक्रवारी कालभैरवनाथ मंदिरात आमदार कोल्हे यांची पेढे तुला करण्यात येणार असल्याचे जाधव यांनी सांगितले. आ, कोल्हे यांच्या नागरी सत्काराच्या नियोजनासाठी मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयात सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली यावेळी कोल्हे यांची गावातून भव्य मिरवणूक काढून विविध संस्था व पक्षाच्यावतीने सत्कार करण्यात येणार असल्याचे निर्णय झाला, श्रीराम गल्लीतील राम मंदिराच्या पटांगणात सायंकाळी भव्य नागरी सत्कार केला जाणार असून या सोहळ्यास पुणतांबा व परिसरातील ग्रामस्थांनी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सुधाकर जाधव, भाऊसाहेब जेजुरकर दादासाहेब सांबारे, बाळासाहेब जाधव आदींनी केले आहे,

# लोखंडी कोयता बाळगून संशयितरित्या फिरणाऱ्या युवकावर कोतवाली पोलिसांची कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील क्लेरा ब्रुस हायस्कूल मैदान परिसरात हातात लोखंडी धारदार कोयता घेऊन संशयितरित्या फिरणाऱ्या युवकावर कोतवाली पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे.

दिनांक १८ मे २०२६ रोजी कोतवाली पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे पोसई प्रविण पाटील व पथकातील अंमलदार हे कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी फोनद्वारे क्लेरा ब्रुस हायस्कूल मैदान परिसरात एक इसम हातात कोयता घेऊन फिरत असल्याची माहिती देत तत्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले.

माहिती मिळताच पोसई प्रविण पाटील व गुन्हे शोध पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मैदान परिसरात एक युवक संशयास्पद हालचाली करताना दिसून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले. दोन पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे लोखंडी धारदार कोयता



आढळून आला.

सदर युवकाने आपले नाव ओंकार अरुण थोरात (वय १८, रा. मोरया पार्क, बोल्हेगाव, ता. जि. अहिल्यानगर) असे सांगितले. याप्रकरणी पोकॉ दत्तात्रय कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४०६/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या सूचनेनुसार गुन्हे शोध पथकाने केली.

## १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाची तयारी पूर्ण

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटन २३ मे रोजी सकाळी १० वा. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण व कृषी मंत्री दत्तात्रय विठ्ठल उर्फ दत्ता मामा भरणे यांच्या शुभहस्ते हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्रामभैय्या जगताप,महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंतराव डांगे, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे,१६ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष संपतदादा बारस्कर,१६ वे संमेलनाध्यक्ष डॉ.संजीवनीताई तडेगावकर, माजी संमेलनाध्यक्ष व माजी आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर व संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ. संदीप सांगळे हे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे व शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी यांनी दिली.

उद्घाटनापूर्वी महापुरुषांना अभिवादन करून शाहिरी जलसा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.यामध्ये शाहीर कल्याण काळे,भारुड सम्राट हमीद सय्यद, शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, डॉ.शेषराव पठाडे, प्रशांत सूर्यवंशी, दिगंबर गोंधळी, हौसीनाथ बोर्डे व शब्दगंधची टीम सहभागी होणार आहे.दुपारी २ वाजता "आधुनिक साहित्यातील स्त्री जीवनाचे चित्रण" या विषयावर निलिमाताई बंडेलु यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यामध्ये संगमनेर येथील सामाजिक कार्यकर्त्या निलीमा क्षत्रिय, मॅक्सवुमन मुंबईच्या संपादिका प्रियदर्शनी हिंगे सहभागी होणार आहेत.

## पिस्टल लोड करून जीवे मारण्याची धमकी; दोघांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील जाधवनगर परिसरात किरकोळ वादातून एका युवकाला पिस्टल दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली असून, याप्रकरणी दोन जणांविरुद्ध कोतवाली पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी सनी राजेंद्र जाधव (वय २८, रा. जाधवनगर, कल्याण रोड, अहिल्यानगर) हे त्यांच्या मित्रासोबत वडिलांसाठी औषधे घेण्याकरिता साई हॉस्पिटल परिसरात गेले होते. त्यावेळी आरोपी रवि ज्ञानेश्वर सांळुके (रा. बोल्हेगाव) व निखील ऊर्फ निकित नेमचंद चव्हाण (रा. सैनिकनगर, बोल्हेगाव) यांनी फिर्यादीसमोर येत वाद घालण्यास सुरुवात केली.

वाद वाढल्यानंतर आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करत त्यांच्याशी झटापट केली. यावेळी आरोपी निखील चव्हाण याने फिर्यादीचे हात पकडले, तर आरोपी रवि सांळुके याने आज तुझा जीवच घेतो अशी धमकी देत कमरेला असलेली पिस्टल काढून ती लोड केली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

फिर्यादी यांनी आरडाओरडा केल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेत भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या इंधन बचत आवाहनाला देशात सर्वप्रथम संजीवनीचा ई - प्रतिसाद

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिक, उद्योग व संस्थांना ऑनलाइन बैठका घेऊन इंधन बचतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले असताना, त्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत संजीवनीने देशात आदर्शवत पाऊल उचलले आहे. आपल्या कामकाज बैठका ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय राबवणारा संजीवनी उद्योग समूह हा देशातील पहिला सहकारी उद्योग समूह ठरला आहे .या बैठकीत जागतिक पातळीवर युद्धजन्य स्थितीत कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे व देशात इंधन बचत केल्यास परकीय चलन वाचवता येईल या बाबीवर संजीवनी समूहाने गांभीर्याने निर्णय घेतले आहे.

उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे तसेच कारखाना अध्यक्ष आमदार विवेक कोल्हे यांनी या उपक्रमासाठी विशेष पुढाकार घेत कारखाना ओरशियर आणि फिल्डमॅन यांच्यासाठी इलेक्ट्रिक बाईक आणि दैनंदिन वापराचे सर्व भाडोत्री वाहने ही सी एन जी व इलेक्ट्रिक असणारीच वापरावी असा निर्णय घेण्यात आला




आहे.आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत इंधन बचत, वेळेची बचत आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला आहे. ग्रामीण सहकार क्षेत्रातही डिजिटल परिवर्तन शक्य असून त्यातून राष्ट्रीय हित साधता येते, हे या निर्णयातून अधोरेखित झाले आहे.

तातडीनं या निर्णयाची अंमलबजावणी करत संजीवनी कार्यस्थळावर इलेक्ट्रिक ट्रॅक्टर वापरासाठी दाखल करण्यात आला आहे त्याची औपचारिक सुरुवात केली आहे.सहकार महर्षी कोल्हे कारखाना हा नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी देशभरात ओळखला जातो. देशातील पहिला सहकारी सीबीजी प्रकल्प उभारण्याचा मान या कारखान्याला मिळाला असून देशात सर्वाधिक इथेनॉल निर्मिती करणारा पहिला सहकारी कारखाना म्हणूनही त्याची विशेष ओळख आहे. केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते या सीबीजी प्रकल्पाचे उद्घाटन झाले होते.

कोरोना संकटाच्या काळातही देशात सर्वप्रथम सॅनिटायझर निर्मिती सुरू करणारा सहकारी कारखाना म्हणून कोल्हे कारखान्याने सामाजिक जबाबदारी पार पाडली होती. आता पुन्हा एकदा ऑनलाइन बैठकींचा निर्णय घेत इंधन बचत आणि पर्यावरणपूरक कार्यपद्धतीचा नवा आदर्श निर्माण करण्यात संजीवनी उद्योग समूहाने पुढाकार घेतला आहे.

या बैठकीत अध्यक्ष बिपीन कोल्हे, आ. कोल्हे, व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर परजणे, सर्व संचालक, अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. त्यानंतर इलेक्ट्रिक ट्रॅक्टर कारखाना कार्यस्थळावर सुरू करण्यात आला त्यावेळी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे, नगराध्यक्ष पराग संधान, साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे, सेक्रेटरी टी. आर.कानवडे, प्रकाश डुंबरे, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घर-घर लंगर सेवेच्या अन्न छत्रालयाला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट

## कोरोना काळापासून सुरू असलेल्या निस्वार्थ सेवाकार्याचे कौतुक




■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर-घर लंगर सेवेच्या तारकपूर येथील अन्न छत्रालयाला पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देत संस्थेच्या कार्याची पाहणी केली. कोरोना महामारीपासून सुरू असलेल्या या सेवाकार्याचा आढावा घेत त्यांनी संस्थेच्या निस्वार्थ सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, नगरसेवक मोहित पंजाबी, जीतू गंभीर, जय भोसले, लंगर सेवेचे जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, राजेंद्र कंत्रोड, मुन्नाशेठ जग्गी, राजू जग्गी, सतीश गंभीर, प्रशांत मुनोत, सुनील थोरात, राजा नारंग, गुलशन कंत्रोड आदी मान्यवर उपस्थित होते.

तारकपूर येथील अन्न छत्रालयात दररोज गरजू, निराधार, कामगार, रुग्णांच्या नातेवाईकांसह अनेक गरजूंना मोफत भोजन उपलब्ध करून दिले जाते. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असताना घर-घर लंगर सेवेने हजारो नागरिकांपर्यंत अन्न पोहोचवून मानवतेचे दर्शन घडविले होते. आजही ही सेवा त्याच समर्पणाने सुरू असल्याने सामाजिक क्षेत्रात या उपक्रमाची विशेष ओळख निर्माण झाली आहे. यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, घर-घर लंगर सेवेने कोरोना काळात भुकेल्यांच्या सेवेसाठी अपार परिश्रम घेतले. अनेक स्वयंसेवकांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून गरजूंना अन्न पोहोचविले. संकटकाळात समाजाच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी मानवसेवा असून, श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानने हे कार्य सातत्याने जपले आहे. ही सेवा आजही तितक्याच ताकदीने सुरू असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य संस्था करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# शेकडो लोकांचे प्राण वाचविणारे पुखराज पिपाडा यांचा गणेश परिसराकडुन सत्कार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** ग्रामीण भागामध्ये रात्रीच्या वेळी रुग्णांना स्वत: रुग्णालयात दाखल करुन वेळीच योग्य उपचार झाल्याने शेकडो लोकांचे प्राण वाचविणारे पुखराज पिपाडा यांचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा असे आवाहन भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी केले.




भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुदेव दत्त पतसंस्थेचे माजी चेअरमन पुखराजजी पिपाडा यांच्या ६५ वी कार्यक्रमानिमित्त सत्कार सोहळा गणेश परिसराच्या वतीने अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. यावेळी प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.ममता पिपाडा, बाळासाहेब गाढवे, संघपती अनिल पिपाडा, पाटपाणी कृती समीतीचे रावसाहेबजी गाढवे, बाबासाहेब गोरे, नरेंद्र पिपाडा, ज्ञानेश्वर चौधरी, राजुशेठ मुनावत, दिलीप क्षिरसागर, सुरेश नाबरिया, नेमिचंद लोढा, डॉ.संतोष भवर, महावीर पिपाडा, पारस पिपाडा, गणेशशेठ भळगटीया, बबनराव घोरपडे, जयाभाऊ काले, जनार्दन गाढवे, शिवाजी सोनवणे, संदिप भळगट, अरुण संकलेचा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, शेतकरी, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुखराजजी पिपाडा यांच्या सामाजिक, आर्थिक व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला. आपल्या मनोगतात भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी सांगितले की, पुखराजजी पिपाडा हे केवळ समाजासाठीच नव्हे तर इतर समाजातील सर्वसामान्य माणसांच्या अडचणींना धावून जाणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी गुरुदेव दत्त पतसंस्था अत्यंत प्रामाणिकपणे, पारदर्शकपणे व दूरदृष्टीने चालवत अनेक कुटुंबांना आर्थिक आधार दिला आहे. पतसंस्थेच्या माध्यमातुन गोरगरिबांचे प्रपंच उभे केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात विश्वास, आपुलकी आणि सेवाभावाची भावना अधिक बळकट झाली आहे.

# ६ वर्षांचा लढा यशस्वी ! पीडित महिलेला मिळाला घराचा ताबा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या आणि गेल्या आठ वर्षांपासून हक्काच्या निवाऱ्यासाठी संघर्ष करणाऱ्या एका परित्यक्ता महिलेला अखेर न्याय मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, श्रीम. रोहिणी ढवळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पुणे यांच्या सूचनेनुसार संरक्षण अधिकारी सौ. मनीषा जाधव, श्री. प्रवीण नेहरकर आणि सौ. कविता चौरे या अधिकाऱ्यांनी दिवसभराच्या कार्यवाहीनंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने रात्री ११ वाजता






पीडित महिलेला तिच्या वडिलोपार्जित घरातील दोन खोल्यांचा प्रत्यक्ष ताबा मिळवून दिला.

सदर प्रकरणात मा. न्यायालयाने वारंवार अर्जदार महिलेच्या बाजूने आदेश देऊनही जाबदार नातेवाईक ताबा देण्यास नकार देत होते. १५ मे २०२६ रोजी संरक्षण अधिकारी पोलिसांसह कारवाईसाठी गेले असता जाबदारांनी आदेश बाजावणीस तीव्र विरोध केला. यावेळी महिला अधिकाऱ्यांना अपशब्द वापरून अरेरावीची भाषा वापरण्यात आली व शासकीय कामात अडथळा आणला गेला. परिस्थिती बिघडल्याने पोलिसांनी जाबदारांना ताब्यात घेतले. गुन्हा दाखल होत असतानाही संरक्षण अधिकाऱ्यांनी कमालीचा संयम दाखवला. त्यांनी पोलीस ठाण्यातच जाबदारांचे समुपदेशन करून त्यांची समजूत काढली. अखेर रात्री उशिरा जाबदार ताबा देण्यास तयार झाले. घरातील अडथळा ठरलेली प्लायवूडची भिंत हटवून रात्री ११ वाजता पीडित महिलेला शांततेत ताबा देण्यात आला. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर पीडित महिलेला सुरक्षित आसरा मिळवून देणारी ही कारवाई कौटुंबिक हिंसाचार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचे एक आदर्श उदाहरण ठरली आहे.

# खडकवासला मतदार संघातील विद्यार्थ्यांचा सन्मान

## आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते अथर्व लोहगावकर यांचा गौरव

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** आयटीआयच्या विद्यार्थ्यांना जर्मनीमध्ये नोकरी व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध झाली असून, भीमराव तापकीर यांच्या हस्ते खडकवासला मतदार संघातील अथर्व लोहगावकर (कुंभार) यांचा विशेष सन्मान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध येथील चार विद्यार्थ्यांची जर्मनी येथे प्रशिक्षणासाठी निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मुंबई येथे आयोजित विशेष कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जर्मनीतील नोकरी व प्रशिक्षणासाठी प्रस्तावपत्र प्रदान करण्यात आले. या निवड प्रक्रियेत विनायक तावरे, आदित्य जाधव, आशिष पासलकर (इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक) तसेच अथर्व लोहगावकर (इलेक्ट्रीशियन) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. जर्मन भाषा प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे विद्यार्थी पुढील प्रशिक्षणासाठी जर्मनीला रवाना होणार आहेत. डोणजे गावचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल केल्याबद्दल भाजपा दिव्यांग विकास आघाडी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव नाना पारगे, सिकृत नगरसेवक गंगाधर भडावळे, देशमुख सर, भाजपा युवा मोर्चा उपाध्यक्ष किरण खिरिड तसेच सामाजिक कार्यकर्ते महादेव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

# राज्य शासनाच्या 'लाडकी बहीण' योजनेत पात्र असूनही अनेक महिला अपात्र

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीरामपूर :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेत पात्र असूनही अनेक महिलांना अपात्र ठरविण्यात आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर श्रीरामपूर पंचायत समिती कार्यालयात महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली. शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार पात्रता पूर्ण करूनही लाभ नाकारण्यात आल्याने महिलांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

योजनेसाठी शासनाने वार्षिक उत्पन्नाची मर्यादा अडीच लाख रुपये निश्चित केली होती. अनेक महिलांनी मागील आर्थिक वर्षात 'निल आयटीआर' अथवा अडीच लाख रुपयांच्या आत उत्पन्न दाखवून आयकर विवरणपत्र भरले होते. काही महिलांनी यावर्षी आयटीआर भरलेला नसतानाही त्यांना थेट अपात्र ठरविण्यात आल्याचा आरोप महिलांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे निकष पूर्ण करूनही लाभ नाकारला जात असेल तर




शासनाची ही योजना केवळ दिखाऊ ठरत आहे, अशी भावना महिलांनी व्यक्त केली.

**शासनाने जर वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २.५० लाख निश्चित केली असेल आणि संबंधित महिलेने २.५० लाखांपर्यंतच आयटीआर भरला असेल, तर त्या महिलेला अपात्र कसे ठरविले जाऊ शकते? हा प्रश्न आता महिलांमधून मोठ्या प्रमाणात उपस्थित होत आहे. शासनाचा निकष अडीच लाख रुपयांपर्यंतचा असेल, तर त्या मर्यादेत आयटीआर भरलेल्या महिलांना पात्र घोषित करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.**

पंचायत समिती कार्यालयात सकाळपासून महिलांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक महिलांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे आपल्या अर्जांची फेरतपासणी करण्याची मागणी केली. मात्र प्रशासनाकडून स्पष्ट मार्गदर्शन मिळत नसल्याची तक्रारही महिलांनी केली. काही महिलांनी ऑनलाइन प्रक्रियेमधील तांत्रिक त्रुटी, चुकीची माहिती आणि अपूर्ण पडताळणीमुळे पात्र महिलांवर अन्याय होत आहे, असा आरोप केला.

# अहिल्यानगर-वांबोरी व राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वेमार्गाला छत्रपती संभाजीनगरपर्यंत 'मिसिंग लिंक'ने जोडण्याची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर ते वांबोरी आणि राहुरी ते शनिशिंगणापूर या नव्याने मंजूर झालेल्या रेल्वे मार्गाला छत्रपती संभाजीनगरपर्यंत अंदाजे ५० किलोमीटरच्या 'मिसिंग लिंक'द्वारे जोडून नवीन रेल्वे कॉरिडॉर विकसित करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात राज्य शासन व रेल्वे मंत्रालयाने विशेष प्राधान्य देऊन सकारात्मक पाठपुरावा करावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

या प्रस्तावित रेल्वे जोडणीमुळे उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्यात थेट रेल्वे संपर्क निर्माण होणार असून धार्मिक पर्यटन, औद्योगिक वाहतूक आणि प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील राहुरी तालुका कृषी, शैक्षणिक, धार्मिक व औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचा असून या भागाला सक्षम रेल्वे संपर्काची आवश्यकता आहे. केंद्र शासनाने अहिल्यानगर-वांबोरी मार्गाशी जोडणाऱ्या राहुरीमार्गे शनिशिंगणापूर रेल्वे मार्गास मंजुरी दिली असून भूसंपादन प्रक्रियेलाही वेग आला आहे. या रेल्वे प्रकल्पामुळे राहुरी, नेवासा, पाथर्डी, शेवगाव तसेच अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघातील अनेक भागांना प्रथमच प्रभावी रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. पुढे हा मार्ग शनिशिंगणापूर ते छत्रपती संभाजीनगरपर्यंत जोडल्यास उत्तर महाराष्ट्र-मराठवाडा रेल्वे कॉरिडॉरची निर्मिती होणार आहे.

# कोपरगाव तालुक्यात पुन्हा जिओची सेवा कोलमडली

## कॉलसह इंटरनेट सुविधा विस्कळीत, वर्क फ्रॉम होम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडचणी वाढल्या

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** एक महिन्यापूर्वी कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी, सुरेगाव परिसरात रिलायन्स जिओची मोबाईल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली होती त्यावेळी दैनिक जनप्रवास मध्ये याबाबतचे वृत्त प्रसिद्ध होताच सेवा सुरळीत होवून नागरीकांनी धन्यवाद दिले होते. परंतु हि सेवा सुरळीत होवून एक महिना होत नाही तोच पुन्हा जिओची सेवा कोलमडली आहे. फुकटचे सीम आता भरमसाठ पैसे मोजून मनस्ताप देत असल्याच्या प्रतिक्रिया जिओ सीमधारकांकडून व्यक्त केल्या जात आहे. यावरून जिओची सेवा कशी सुरु असेल याची कल्पना येते.

कोळपेवाडी, सुरेगाव परिसरात गेल्या दोन चार दिवसांपासून रिलायन्स जिओची मोबाईल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली असल्याने हजारो जिओ ग्राहकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. कॉल लागत नसल्याने जिओ ग्राहकांचा मोबाईल वरून संपर्क होत नसून इंटरनेटचा वेगही अतिशय मंदावला आहे. ज्यांनी जिओ एअर फायबरचे इंटरनेट कनेक्शन घेतले आहे व ते कनेक्शन टीव्हीला जोडून मनोरंजनाचा आनंद घेणाऱ्या ग्राहकांना देखील कपाळावर हात मारून घ्यावा लागत आहे. सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेट हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. मोफत सेवेचे आमिष दाखवून लाखो मोबाईल धारकांना आपल्या जाळ्यात ओढणारी रिलायन्स जिओ कंपनी इंटरनेट सेवा देण्यात कुचकामी ठरत आहे. त्यामुळे फोन कॉल लागत नाही.तुम्ही ज्या व्यक्तीशी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत आहात ती व्यक्ती दुसऱ्या कुणाशी तरी बोलत, थोड्या वेळाने संपर्क करा, हा नंबर अस्तित्वात नाही असा व्हाईस मेसेज येतो आणि जर चुकून कॉल लागलाच तर अचानकपणे समोरच्या व्यक्तीचा आवाजच बंद होतो अशा प्रकारे जिओ ग्राहकांना त्रास सहन करावा लागत आहे मात्र याकडे माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दुर्लक्ष होत आहे.

# तहसिल, पोलिस प्रशासन दखल घेत नाही : आता कोणत्या क्षणी आमरण उपोषण

■ जनप्रवास प्रतिनिधी

**जामखेड :** कलेच्या नावाखाली कलाकेंद्रात चालु असलेले अवैध धंदे बंद करण्यासाठी वारंवार निवेदन, उपोषण, आंदोलन केली मात्र तहसिल, पोलिस प्रशासन दखल घेत नाही त्यामुळे कलाकेंद्र मालकांकडून माझ्या व कुटुंबाच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे .त्यामुळे आता कोणत्या क्षणी अमरण उपोषण सुरू करणार असल्याचा सचिन दत्तात्रय आजबे यांनी निवेदनाद्वरे इशारा दिला आहे .

दि २० मे रोजी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नावाखाली जामखेड तालुक्यातील मोहा हद्दीतील काही कला केंद्रांवर कायमस्वरूपी कारवाई करण्यात यावी, संबंधित कला केंद्रे निवासी व वाणिज्य परवाना न घेता शेतीच्या जागेवर बेकायदेशीररित्या सुरू असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच या ठिकाणी खुलेआम वेश्या व्यवसाय, मद्यप्राशन व मद्यविक्री सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे जामखेड शहरासह परिसरातील नागरिकांच्या सामाजिक प्रतिष्ठेला बाधा पोहोचत असून वातावरण दूषित होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.जामखेड शहर व परिसर सामाजिक, शैक्षणिक आणि वाणिज्य क्षेत्रात प्रगती करत असताना अशा प्रकारच्या बेकायदेशीर व्यवसायांमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. लोकशाही मार्गाने प्रशासनास वारंवार याबाबत सविस्तर सांगितले .तसेच दि.०७/०५/२०२६ रोजीच्या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल न घेतलेली नाही . त्यासंदर्भात संबधित प्रशासनाला स्मरण म्हणून दि २० मे रोजी निवेदन दिले आहे .यांचेवर कायदेशीर कार्यवाही न झाल्यास दि.०८/०६/२०२६ दरम्यान कधीही अमरण उपोषणास बसणार आहे. तरी याची प्रशासनाने दखल घ्यावी व योग्य ती कार्यवाही करून मला न्याय द्यावा ही नम्र विनंती.तरी माझ्या जीवीतास किंवा माझ्या कुटूंबास काही बरेवाईट झाल्यास त्याची सर्वस्वी कलाकेंद्र मालक व प्रशासन जबाबदार राहिल असे निवेदनात म्हटले आहे. सदर निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी अहिल्यानगर, जिल्हा पोलिस अधीक्षक अहिल्यानगर, प्रांताधिकारी, तहसीलदार पोलीस निरीक्षक यांना पोस्टाने पाठविण्यात आल्या आहेत .

# औटीवाडी तलाव परिसरात मोटार-केबल चोरीचा धुमाकूळ; ३६ शेतकऱ्यांचे सुमारे १५ लाखांचे नुकसान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरातील औटीवाडी येथील काळभैरव तलाव परिसरात पुन्हा एकदा मोटारी व कॉपर केबल चोरीची मोठी घटना घडली असून, चोरट्यांनी तब्बल ३६ शेतकऱ्यांच्या मोटारींना जोडलेल्या कॉपर केबल चोरी करून नेल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या चोरीमध्ये अंदाजे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार (दि. १८ मे २०२६) रोजी रात्री औटीवाडी परिसरातील शेतकरी ऊस व इतर पिकांना पाणी देत होते. गावात रात्री ९ ते पहाटे ५ वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरू असल्याने अनेक शेतकरी मोटारी सुरू करून शेतात पाणी देण्यासाठी गेले होते. दरम्यान, मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास काही शेतकऱ्यांच्या मोटारी अचानक बंद पडल्या. त्यानंतर शेतकऱ्यांनी तलाव परिसरात पाहणी केली असता मोटारींना जोडलेल्या कॉपर केबल अज्ञात चोरट्यांनी कापून चोरी केल्याचे निदर्शनास आले.

घटनास्थळी शोध घेत असताना तलावाकडे येणाऱ्या रस्त्यावर संशयास्पद पांढऱ्या रंगाची कार दिसून आली. ग्रामस्थ जवळ जाताच कारमधील तिघेजण वाहनासह पसार झाले. मोटारसायकलवरून पाठलाग करत असताना संशयित वाहनाचा क्रमांक एमएच १२ एनएक्स ६२६६ असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. ग्रामस्थ अंकुश हिरडे यांनी वाहन आडवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने त्यांच्या अंगावर गाडी घालण्याचाही प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले. संतप्त ग्रामस्थांनी वाहनावर दगडफेक केली, मात्र चोरटे भरधाव वेगाने आढळगावच्या दिशेने पसार झाले.



या चोरीत आनंदा औटी, अंकुश हिरडे, अंकुश औटी, गणेश औटी तसेच नगरसेवक दादा औटी यांच्यासह सुमारे ३६ शेतकऱ्यांच्या मोटारींना जोडलेल्या कॉपर केबल चोरीला गेल्या आहेत. विशेष म्हणजे, मागील दीड वर्षांपासून याच तलाव परिसरात सातत्याने मोटारी व वीज केबल चोरीच्या घटना घडत असून लाखो रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे. दोन महिन्यांपूर्वीही याच परिसरातील मोटारी चोरीला गेल्याची घटना घडली होती. मात्र, अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. या प्रकरणी औटीवाडी येथील संदीप जगन्नाथ औटी (वय ४६) यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, औटीवाडी गावातील काळभैरव तलावातून सुमारे १४० शेतकरी शेतीसाठी पाणी वापरतात. शेतकऱ्यांनी मोटारींना कॉपर केबल जोडून पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली आहे. दि. १८ मे रोजी रात्री शेताला पाणी देत असताना अचानक मोटार बंद पडल्याने पाहणी केली असता कॉपर केबल कापून चोरी केल्याचे उघड झाले. त्यानंतर परिसरातील इतर शेतकऱ्यांच्या मोटारींच्याही केबल चोरीला गेल्याचे समोर आले. फिर्यादीत तीन अज्ञात इसमांविरोधात चोरीचा संशय व्यक्त करण्यात आला असून, त्यांनी पांढऱ्या रंगाच्या कारमधून येऊन तलाव परिसरातील मोटारींच्या केबल चोरी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वारंवार होणाऱ्या चोरीमुळे औटीवाडी परिसरातील शेतकरी अक्षरश: हवालदिल झाले असून, त्यांच्या शेतीसह जीवितालाही धोका निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक अनिल (महाराज) औटी, नगरसेवक दादा औटी, आबा औटी, संदीप जगन्नाथ औटी, गणेश औटी, अंकुश औटी,छगन लबडे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी श्रीगोंदा पोलीस निरीक्षकांना निवेदन देत आठ दिवसांच्या आत आरोपींना अटक न झाल्यास श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. विशेष म्हणजे, या आंदोलनात महिला तसेच गुरे-जनावरे घेऊन उपोषणात सहभागी होण्याचाही इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन अहिल्यानगर पोलीस अधीक्षक तसेच श्रीगोंदा तहसीलदार यांनाही देण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक आहेरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करत आहेत.

# सकारात्मक राहून आपल्या योग्यतेवर विश्वास ठेवावा

सुखी जीवनाच्या चौकटीत स्वत:ला बंदिस्त करून घेणाऱ्या बऱ्याच लोकांची मानसिक स्थिती ही आपण भले आणि आपले भले याच्या बाहेर जात नाही. चाकोरीबद्ध जीवन जगताना निराशा आणि निरुत्साहीपणा याच्यामुळे काही जणांच्या प्रगतीला खीळ बसते.

ही खिळ बसू नये याकरिता आपण सदैव आनंदी आणि उत्साही राहणे म्हणजेच आपल्या प्रगतीस हातभार लावण्यासारखी आहे. आपण नोकरदार असा किंवा कॉलेजला जाणारे विद्यार्थी, ऑफिसात एखादे नवे असाइनमेंट मिळालेले असो वा 'एसएससी'ची तयारी करत असा; क्षेत्र मग ते कुठलेही असो, प्रगती आणि यशाची इच्छा प्रत्येक ठिकाणी प्रत्येकाकडे असतेच असते.

यश त्याचवेळी मिळते जेव्हा आपले काम चांगले असेल. आपले प्रयत्न १०० टक्के योग्य दिशेने झालेले असले पाहिजे. आपले प्रयत्न



आणि आपले काम तेव्हाच योग्य ठरू शकते जेव्हा आपले मन प्रसन्न असेल. प्रगतीचा मूळ मंत्रच आनंदी राहणे आणि स्वत:ला प्रसन्न ठेवणे हा आहे. आता प्रश्न असा आहे की आनंदी कसे राहायचे ? खरेतर, हा आनंद आपल्या अंतरीच कुठे तरी दडून बसलाय. गरज आहे ती फक्त त्याला शोधण्याची !

◆ आनंदी राहण्यासाठी आपण आपला जास्तीत जास्त वेळ आपल्या कुटूंबासोबत व्यतित केला पाहिजे. सर्व चिंता दूर करून प्रसन्न राहण्याचा हा सर्वांत चांगला मार्ग आहे.

◆ आपल्या आयुष्यातील कटू आठवणींना विसरून जा. या आठवणींना उगाळून फायदा तर काहीच नाही उलट, नुकसानच जास्त आहे. मानसिक आणि शारीरिक कष्टाशिवाय दुसरे काय हाती लागणार ?

◆ सकारात्मक राहून आपल्या योग्यतेवर विश्वास ठेवावा. जोपर्यंत आपला स्वत:वर विश्वास बसत नाही तोपर्यंत आपल्यावर दुसरा कुणीही विश्वास ठेवणार नाही.

◆ आपल्या ओळखीच्या माणसांशी, नातेवाईकांशी फोन, ई-मेल द्वारे संपर्कात राहा-वे.

◆ आपल्या व्यस्त कामांतून स्वत:साठी थोडा वेळ काढा. असे केल्याने काम करण्यासाठी आणखी ऊर्जा मिळेल.

◆ आपल्या आंतरिक भावना कुटूंबात आणि परिचित व्यक्तींसमोर व्यक्त करा.

◆ वादात पडू नका. आपल्या यशास हे बाधक ठरू शकते.

◆ क्रोधावर नियंत्रण ठेवा. निर्णय नेहमी शांत चित्ताने घ्या.

◆ दुसऱ्यांना त्यांच्या चांगल्या कामासाठी शुभेच्छा द्या. मग, आपल्यालाही कॉम्प्लिमेंट्स मिळतील.

◆ तणाव दूर करण्यासाठी संगीत ऐकणे हा एक चांगला मार्ग आहे. मधुर संगीत आपली मानसिक आणि शारीरिक क्रियाशीलता वाढवण्यास मदत करते.

◆ आपले जीवन हे आव्हानांनी भरलेले आहे. धैर्यनिशी, संकटांचा सामना करण्यासाठी तयार राहा आणि त्यांच्याशी लढा.

◆ चांगले खा, कष्ट करा. लहान-सहान गोष्टी सेलिब्रेट करा. प्रत्येक क्षण अनमोल आहे.

◆ चुका सर्वांच्याच हातून घडतात. नाराज होण्यापेक्षा या चुकांतून शिकायला हवे.

## सौंदर्यासाठी पोटही सुडौल राखायला हवे

बहुधा स्त्रिया चेहरा, हात पाय व केसांच्या साजशृंगाराकडे जेवढे लक्ष देतात तेवढे पोटाच्या सुडौलतेकडे देत नाहीत. ख-या सौंदर्यासाठी पोटही सुडौल राखायला हवे. त्यासाठी काही खास टिप्स.साडी नेसल्यानंतर पोट उघडे राहाते. ते सुडौल असेल तर पोट उघडे असेल, तरी बेढब दिसत नाही. पोट सुडौल करण्यासाठी साडी,सलवार पॅण्ट इ.पोटावर आवळूनबांधू नयेत. अन्यथा त्याजागी रक्ताचा प्रवाह कमी होवून काळया रेषा पडून सौंर्दय बिघडू शकते.


पोटाची त्वचा तुकतुकीत करण्यासाठी दर तीन-चार दिवसानंतर एकदा कोमट पाण्याने पोट स्वच्छ करा. आठवडयातून एकदा पोटावर हलक्या हाताने उटणे लावा. नृत्य,पोहणे यामुळेही पोट सुडौल राहणे व त्वचा तुकतुकीत होते.जर आपले पोट वाढले असेल, तर पातळ साडी नेसणे सोडा, सलवार,सूट इ.जास्त आवळून वा जास्त सैलही नेसू नका.

पोट सुडौल करण्यासाठी जमिनीवर उताणे सरळ झोपून श्वास घ्यावा व हात जमिनीवर टेकवून पाय जमतील तेवढे वर उचलावेत. नंतर श्वास सोडून पाय खाली आणावेत.

सरळ उभे राहून हात वर उचलावेत व गुडघे न वाकवता पायांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करावा.

# अहंकार दुखावणे स्वाभाविकच

समस्त प्राण्यांमध्ये बरेच गुण आदिकाळापासूनच आहेत. अहंकार हा त्यातीलच एक, पक्षी, असो व प्राणी वा माणूस आपल्या अहंकारासाठी कोणतीही मर्यादा ओलांडीत असतो.



'अहं'चा शाब्दिक अर्थ 'मी' त्याला पर्यायवाची शब्द अभिमान, अहंकार, दंभ, घमेंड, गर्व इ. कधी - कधी काहीजण अहंकार झाल्यानंतर त्याला स्वाभिमानाचा रंग देण्याचा प्रयत्न करतात, जर थोडासा विचार केला, तर अहंकार व स्वाभिमानामध्ये एक अदृश्य लक्ष्मणरेषा आढळते. ती ओलांडणे सोपे असते, पण ओलांडल्यानंतर आपल्याभोवती अभेद्य असे एक आवरण तयार होते जे आपल्याला कुटुंब व समाजापासून दूर करते. स्वाभिमानी होण्याचा अर्थ असा नव्हे, की आपण कोणचीही बाजू ऐकून न घेता त्याला दोषी मानणे तसेच आपला निर्णयच सर्वश्रेष्ठ मानतो. तांत्रिकदृष्ट्या विचार करता समस्त समस्यांचे मूळ हा अहंकारच आहे. माणसाने आपल्या अहंकारापोटी शस्यश्यामला वसुंधरेच्या अंगावरील हिरवे वस्त्र ओरबाडून काढले आहे. स्वच्छंदाने बागडणाऱ्या मुक्या प्राण्यांना फक्त मारलेच नाही, तर त्यांना दिवाणखान्यात समवून ठेवले. आज जागतिक पातळीवर सीमाप्रश्न उद्‌भवत आहेत व त्या अहंकारामुळेच. जमिनीचा एक तुकडा लाखो सैनिकांपेक्षा जास्त मौल्यवान असतो का ? फक्त आपले विचार पसरवण्यासाठी इतरांच्या इच्छांचा गळा घोटला जातो. आपण संपूर्ण आहोत हे सिद्ध करण्यासाठी भौतिकतेची आंधळी शर्यत चालू आहे. तशी या नाण्याची दुसरी बाजूही आहे. आज आपण प्रगत झालो आहे त्याच्या मुळाशी कोठेतरी अहंकारच आहे. यशाच्या प्रेरणेपर्यंत अहंकारच आपल्याला पुढे नेत असतो. व्यापक अर्थाने पाहता अहं सृष्टा आहे, विनाशक नव्हे, व्यापकदृष्ट्या विचार करता पृथ्वीवर राहणारे सर्वजीव बंधू आहेत. सारे नागरिक एकमेकांचे भाऊ आहेत. पृथ्वी सर्वांची जननी आहे. सारे आकाश आमचे छप्पर आहे जर कोणी याचे नुकसान करीत असेल वा छेडछाड करीत असेल, तर आपला अहंकार दुखावते स्वाभाविक आहे आणि तेच व्हायला हवे.

# कोणतेही नवे काम सुरु करण्यापूर्वी त्याची संपूर्ण माहीती घ्या

माणसाची सर्वात मोठी शक्ती म्हणजे त्याचा आत्मविश्वास परंतु घरातील जबाबदारी कुशलतेने पार पाडणाऱ्या अनेक गृहिणी घराबाहेर काम करायला घाबरत असतात. विजेचे बिल भरणे, गॅस बुक करणे वा मुलांच्या शाळेची फी भरणे, इ. कामे पुरुषच करीत असतात. गरज असेल तेव्हाही महिलाही कामे करायला घाबरतात.

बऱ्याच नोकरदार महिलाही भित्र्या स्वभावाच्या असतात. त्या आपल्या कामाव्यतिरिक्त इतर काम करताना स्वत:ला मागे ठेवतात. त्यांना आपण ते काम व्यवस्थित करु शकू की नाही ही भीती वाटत असते. खरे तर बदलत्या



वातावरणात प्रत्येक महिलेने स्वत:त आत्मविश्वास निर्माण करायला हवा. कसा ते पाहू...

स्वत:ला महत्व द्यायला शिका.

- नवे काम सुरु करण्यापूर्वी त्याची संपूर्ण माहिती घ्या.
- विषय-वस्तू समजून घेऊन काम करण्याचा प्रयत्न करा.
- जे काम येत नसेल ते मन लावून व प्रामाणिकपणे करा.
- मी हे काम पूर्ण करणारच असा मनाशी निश्चय करा.
- टिकेकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहा. सकारात्मक विचारांनी ऊर्जा संचारते. व त्यातून काम करण्याची प्रेरणा मिळते.
- हेटाळणी करणे टाळा, एखाद्याला चांगल्या कामासाठी प्रेरित केले तर त्यामुळे स्वत:लाही आनंद व समाधान मिळते.
- शाळा कॉलेजातील मधुर स्मृतींव्दारे आत्मविश्वास मिळवावा.
- कधी-कधी आपल्याला इतरांपेक्षा वेगळे व उत्तर करणाऱ्या कौतुक, स्तुती प्रशंसा आठवून आत्मविश्वास वाढवा.
- सामूहिक कामांमध्ये नेहमी सक्रिय राहा होणाऱ्या स्पर्धांमध्ये भाग घ्या.
- आव्हाने स्वीकारल्यामुळे आत्मविश्वास निर्माण होईल.

# प्रेमात जर रूसवे-फुगवे, भांडण असेल तर प्रेमाची लज्जत अधिक वाढते

प्रेमात जर रुसवे-फुगवे, भांडण असेल तर प्रेमाची लज्जत अधिक वाढते. विशेषत: जेव्हा एकत्र राहूनही एकमेकांविषयी ओढ वाढत नसेल तर विवाहित जोडप्यांनी अवश्य परस्परांशी भांडायला हवे.

लग्नानंतर दोन-तीन वर्षे उलटली की, छोट्या छोट्या कारणांवरून पती-पत्नीत वाद होऊ लागतात. याचे कारण म्हणजे लग्नानंतरच्या पहिल्या काही वर्षांत एकमेकांचे योग्य-अयोग्य सारे आवडत असते. पण त्यानंतर एकमेकांच्या क्षुल्लक गोष्टीही खटकू लागतात.

विवाहबंधन अतूट राहण्यासाठी परस्पर मतभेद प्रकट करणे आवश्यक असते.

एकमेकांच्या सवयींबद्दलची नापसंती



स्पष्टपणे सांगायला हवी. ती आतल्या आत घुसमटत ठेवू नका.

एका सर्वेक्षणात आढळले आहे की, लग्नानंतर प्रारंभीच्या काळात परस्पर वाद करणारे कमी सुखी आढळतात याउलट काही वर्षांनी वाद घालणारी जोडपी जास्त सुखी आढळतात कारण वादातून ते एकमेकांच्या आवडीनिवडी व सवयी चांगल्याप्रकारे समजून घेऊन त्यानुसार स्वत:ला राखतात. आपले वैवाहिक जीवन सुखी होण्यासाठी वादाच्या सकारात्मक व नकारात्मक पध्दती समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.


**वादाच्या सकारात्मक पध्दती**

- एकमेकांचे विचार योग्य प्रकारे समजण्याचा प्रयत्न करणे व त्यातील दोघांना पटणारे विचार अनुसरणे.
- फक्त भांडरातच नव्हे तर प्रेमात व हास्य विनोदातही एकमेकांना पूर्ण साथ द्यायला हवी.
- एकमेकांच्या संमती, नापसंती दोन्ही स्थितींसाठी तयार असायला हवे.

**वादाच्या नकारात्मक पध्दती**

- प्रदीर्घकाळ कर्कश आवाजात भांडणे.
- वाद नसेल तेव्हाही आपण या माणसाबरोबर का राहतो असा विचार करणे.
- आपण क्वचितच वाद घालीत असाल तर तेवढेच क्वचित एकमेकांसोबत आनंदात घालवित असाल तर.

# संसार मॅनेज कराल तरच सुखाचा होईल



प्रत्येक व्यक्ती सुखाच्या पाठी धावत असताना आपल्या मनातील असणाऱ्या विचाराचे स्थान पूर्णपणे विसरुन जात आहे. आणि यामुळे संसारात करावी लागणारी तडजोड कोणत्या प्रकारे करावी व कशी करावी याचे नियोजन पूर्णपणे विसरले जाते आहे. तेव्हा प्रत्येक व्यक्तीने आपल्या संसारात मॅनेजमेंट करुन कोणत्या प्रकारे हा संसार चांगल्या रितीने फुलविता येईल, त्यास बहर येईल अशा रितीने आपण कोणतीही संसारीक गोष्ट करताना त्याअगोदर त्याचे पूर्वनियोजन करणे गरजेचे असते. मात्र, पती-पत्नींनी एकमेकांना विश्वासात घेऊन आपण अशा प्रकारचे नियोजन करु या का ? अशी विचारणा एकमेकांनी एकमेकास केल्यास आणि त्यातून आपले इतर बजेट कुठे फेल तरी जाणार नाही ना ? याचा विचार करुन एकमेकांनी जर प्रश्न सोडविले तर ही अडजेस्टमेंट खूप चांगल्या प्रकारे आपल्या संसारास बळकटी देऊ शकेल. प्रत्येक बाब ही आपले मॅनेजमेंट स्कील वापरुन केल्यास त्याच्यामध्ये बळकटी येऊ शकते. अन्यथा आपल्या संसार प्रपंचामध्ये कुठेतरी प्रगतीला खीळ घालण्यासारखे होऊ शकेल. योग्य वेळी योग्य नियोजन आणि त्यासाठी योग्य कृती हीच गरज असते. म्हणून जीवन जगत असताना संसाराच्या जगात आपण आपल्या पद्धतीने मॅनेजमेंट करुन गरजेचेच असते. ते जर नाही झाले तर इतरांच्या दृष्टीने,शेजारपाजाऱ्यांच्या दृष्टीने, मित्रपरिवाराच्या दृष्टीने नातेवाईकांच्या दृष्टीने आपण अतिशय कमकुवत आहोत असे संबोधले जाते. यामुळे विचारी मनाला एक समज देऊन चांगल्या प्रकारचे नियोजन आखून, नियोजनबद्ध पद्धतीने गेल्यास संसार सुखाचा होऊ शकतो.

माणसाचे जीवन लग्नानंतर खूप बदलते. अशावेळी जीवनात स्पार्क राखण्यासाठी उभयतांनी प्रयत्न करायला हवेत. या कामासाठी गरज असते ती मॅनेजमेंट स्किलची. जर आपण लग्नाबाबत गांभीर्याने विचार करीत असाल तर आपल्याला फ्युचर प्लॅनिंगही करावे लागेल.

जर आपण लग्नापूर्वीच वैयक्तिक व कौटुंबिक स्तरावर आर्थिक नियोजन केले, तर भविष्यात आपल्याला त्याचा खूपच आधार मिळेल. जर आपण सर्व माहित असूनही भावी स्थितीबाबत अज्ञानी राहाल तर सुखी संसाराचे त्रासात रुपांतर व्हायला वेळ लागणार नाही. लग्नापूर्वी उभयतांनी एकमेकांची लाईफस्टाईल व खर्चाविषयी संपूर्ण माहिती घ्यायला हवी.

आपल्याला लग्नापूर्वीच आपले व आपल्या जोडीदाराचे एकत्रित उत्पन्न किती असेल आणि त्याचे खर्च किती असतील हे जाणून घ्यायला हवे. आपण उधळे आहात की काटकसरी हे आपल्या पार्टनरला सांगायला हवे. त्यानंतर आपले पक्के उत्पन्न किती आहे हे ही जाणून घ्या. कित्येकजण आपल्या पत्नीला कित्येक वर्षे आपले मासिक उत्पन्न किती आहे हे ही सांगत नाहीत. त्यामुळे पत्नीही पतीपासून बऱ्याचशा गोष्टी लपवून ठेवते व पतीला न विचारताच वायफळ खर्च करतात.

आपल्या फॅमिली खर्चासाठी एकाच क्रेडिट वा डेबिट कार्डचा वापर करावा. त्यामुळे होणाऱ्या खर्चाचा अंदाज येईल व कोणत्याही खर्चांना आळा घालता येईल हे कळू शकेल.

नवपरिणीत वधूने आपल्या पतीला त्याच्या कुटुंबीयांसोबत वेळ घालविण्याची संधी द्यायला हवी. प्रत्येक घराची संस्कृती वेगळी असल्याने कधीही माहेर-सासरची तुलना करु नये. नव्या घरी पतीशिवाय आणखी एखाद्या व्यक्तीचा विश्वास संपादन करावा. एकत्र कुटुंबात नव्या सुनेने आपल्या सासूचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करावा. सोबत शॉपिंगला जाणे, एकत्र चित्रपट पाहाणे यातून तिच्याशी जवळीक साधावी. यामुळे अडीअडचणीत तिची मदत आपण घेऊ शकाल. अशाप्रकारे आपला संसार मॅनेज कराल, तर नक्कीच आपला संसार सुखाचा होईल.

# सुगरणीचा सल्ला

0 फरसबी किंवा फ्लॉवर ह्यांची आदल्या दिवशीची भाजी उरली असल्यास त्यात उकडलेले बटाटे, गाजर किसून व ब्रेडच्या स्लाईस, आलं-लसूण घालून चांगले मळणे. (लसणीची चटणी असल्यास) आलं-लसूण न घालता चटणी आयत्या वेळी घातली तरी चालेल. त्याचे गोळे रव्यावर थापून मस्तपैकी कटलेट बनवावे. मुलांच्या डब्यात तसेच जेवताना खावयास द्यावेत.

0 कोबी अर्ध कापून शिल्लक ठेवला तर तो थोडा खराब होतो. त्याऐवजी कोबीची आपणास हवी तेवढी पाने सुटी करून घ्या व जुळवून कापा, सोपे आहे. उरलेला गड्डा आतला, अगदी कोवळा असतो तो कोशिंबीर, सॅलड करायला अगदी छान असतो व अख्खा असल्याने निश्चितच बरेचसे दिवस टिकतो.

0 उन्हाळ्यामध्ये भाज्यांना नारळ घातलेला असेल, तर भाजी लवकर खराब होते. म्हणून भाजी फोडणीत टाकायच्या आधी नारळ फोडणीत टाकून परतावाव नंतर भाजी फोडणीला टाकावी.

0 टोमॅटो सूप करताना बीटचा तुकडा टाकला तर सूचपला चांगला लाल रंग येतो.

0 कांद्याला मोड आल्यास ते सँडविच, चटणी, कोशिंबीर, सूप, सॅलेडमध्ये वापरावे वेगळा स्वाद येतो.

कधी कधी भाज्यांना खूपच माती लागून येते किंवा काही भाज्या-जसं आलं, कारली वगैरे - ज्यांच्या खाचाखाचांतून माती लागलेली असते. साध्या साध्या धुण्याने एकदम स्वच्छ होत नाही. अशा वेळेस त्या भाज्यांना एकदा धुऊन मग उभट भांड्या, पाणी टाकून तुरटी फिरवून थोडा वेळ ठेवावं. सगळी माती तळाशी बसते. पुन्हा एकदा धुऊन वापरायला घ्याव्यात.

0 रस्सा किंवा सांबार लालभडक तवंग हवा असेल, पण तिखटपणा कमी हवा असेल तर तेलाची फोडणी करून त्यात थोडा टोमॅटो सॉस व एक चमचा तेल तिखट घालून परतावे. नंतर त्यावर उकळते पाणी ओतावे. तेल कमी घालूनही तवंग छान येतो.


0 हिरवी मिरची व कोथिंबीरीची ओली चटणी करताना वेळेवर घरात नसेल तर कच्या बटाटावरचे साल काढून किसून चटणीत

0 फ्रीज नसणाऱ्यांकडे हिरव्या मिरच्या वाया जातात. लाकडी टोपली घ्यावी व त्यात वाळलेल्या हिरव्या मिरच्या वर्षभर साठवाव्यात. एकदाच मिक्सरमधून बारीक दळून काढाव्यात. हे हिरवे तिखट भरपूर तिखट होते. पापडांत, हिरव्या पातळ भाजीत थोडे वापरले तरी पुरते.

0 व्हेजिटेबल कटलेटस करताना शिजवलेल्या भाज्यांचे मिश्रण बरेच वेळा सैल होते, ज्यामुळे कटलेटसचा आकार नीट होत नाही. अशा वेळी पोहे भाजून मिक्सरमधून त्याची रवाळ पूड करून आवश्यक त्या प्रमाणात भाज्यांच्या मिश्रणात घालावी म्हणजे आकार व्यवस्थित होऊन कटलेटसही खुसखुशीत होतात.

# आपल्या वाईट व्यक्तीमत्वामुळे इतरांच्या लेखी आपण अगदी किरकोळ बनून जातो


जगताना अनेक आपणास कडू-गोड अनुभव येत असतात. या अनुभवाच्या शिदोरीवरती आपण चांगले-वाईट निर्णय घेत असतो. मात्र, आपल्यातल्या दुर्गणांना आपण बाजूला सारत नाही याचमुळे आपण आपल्या व्यक्तीमत्वाचा पैलू उजळण्याऐवजी त्याला अगदी खिळ घालतो. आपले व्यक्तीमत्व बहुढंगी असते. मात्र समोरच्यावर त्याचा काय परिणाम होतो याचा आपण विचार करत नाही. याचमुळे आपण इतरांच्या दृष्टीने केवळ टाईमपास होतो. म्हणून आपण आपल्या व्यक्तीमत्वाचा पैलू जपून त्यावर चांगल्या प्रकारचा विचार केल्यास आणि तसे वर्तन केल्यास आपले व्यक्तीमत्वाची व्यक्तीरेखा इतरांपेक्षा सरस आहे याची जाणीव नेमकेपणाने होईल. एखाद्या पार्टीच्या ठिकाणी जर आपण गेलो तर आपल्या सभोवताली इतरांचा गराडा पडावा याउलट घडते. आपणाला पाहिल्यानंतर व्यक्ती तोंड फिरवतात. याचाच अर्थ आपल्या व्यक्तीमत्वातील जो वाईट गुण असतो त्यामुळे इतरांच्या लेखी आपण अगदी किरकोळ बनून जातो. हे किरकोळ बनने म्हणजे इतरांच्या लेखी आपण अगदीच नगण्य असतो. मात्र, असे घडू नये असे जर आपणास वाटत असेल तर थोड्या फार फरकाने आपला स्वभाव बदलणेच हितकारक असते अन्यथा आपल्या स्वभावाचा फायदा घेत इतर आपल्यावरती कुरघोडी करतात. आणि आपल्या व्यक्तीमत्वाचा इतरांवरती वाईट छाप पडतो. म्हणून प्रत्यक्षात जेव्हा केव्हा एखादी व्यक्ती आपणाला टाळत असेल तर त्या व्यक्तीपासून चार हात दूर रहा. व आपल्या व्यक्तीमत्वामधील दुर्गण जो आहे तो दुर्गण कशा रितीने दूर करता येईल त्याकरिता प्रयत्नवत रहा. यामुळे तुमचे व्यक्तीमत्व आणि जीवनशैली परिपूर्णपणाने बदलून जाईल आणि जे लोक आपली हेटाळणी करतात तेच लोक आपल्या जवळ येऊन आपली विचारपूस करु



लागतील. अशा प्रकारचे व्यक्तीमत्व आपण बनवा. यामुळे आपली किंमत आपणच वाढवून शकता. हव्यासापोटी कोणत्याही गोष्टीच्या पाटी अवास्तव वेळ घालवू नका. जो वेळ मिळेल तो वेळ आपले व्यक्तीमत्व कशा प्रकारे परिपूर्ण करता येईल याकडे लक्ष द्या. म्हणजेच तुम्ही समाज माणसांमध्ये प्रतिष्ठीत होऊन सर्व परिचित व्हाल व आपला हेवा वाढेल. यामुळेच तुमचे स्थान तुम्हीच निश्चित करु शकता व हे स्थान तुम्हाला किर्तीस्थानापर्यंत पोहचवू शकते. बहुतांशी महिला एवढ्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या असतात की एखाद्याच्या घरी गेल्यानंतर त्यांचे उत्तम स्वागत होते. त्यानां भेटून लोकांना आनंद होतो. याउलट काही महिलांबाबत त्यांच्या मैत्रिणीही बोअर होतात.पण या महिलांना लोक आपल्यामुळे बोअर झालेत हे ही लक्षात येत असते. काहीजणी सतत बडबड करीत राहतात. त्या स्वत:च प्रश्न विचारतात, स्वत:च उत्तरे देतात. स्वत:च विनोद करतात, स्वत:च हसतात. जर एखादी मैत्रीण बोलू लागली तर तिला मध्येच थांबवून स्वत:च बोलत राहतात. बऱ्याचजणींना स्वत:च्या नवऱ्याच्या कर्तृत्वाचीच टिमकी गाजवायची सवय असते. बढाया मारीत त्या स्वत:च्या बोलण्यालाच महत्व देतात व इतरांना काहीच बोलू देत नाहीत. आपणास बोलू देत नाहीत. आपण अशा बोअर महिलांपैकी नाहीत ना. ज्यांना आपण इतरांना बोअर करीत तर नाही ना याची जाणीव असते त्या सहसा बोअरही होत नाहीत. कारण त्या स्वत: रमण्याऐवजी आपण आपल्याला भेटणाऱ्यांवर कसा प्रभाव पाडतो याचा नेहमी विचार करतात. आपण इतरांना बोअर करीत नाही ना हे पाहण्यासाठी आपल्या भेटणाऱ्यांचे वागणे बारकाईने पाहायला हवे. जर ते आपल्याला पाहून नजर चुकवित असतील आपल्याला भेटल्यानंतर वारंवार जांभया देत असतील, आपले बोलणे सुरु होण्यापूर्वीच वेगळ्याच गप्पा मारीत असतील तर आपल्या बोलण्यात त्यांना रस नाही हे आपण समजून घ्यायला हवे. बऱ्याचदा आपण त्याच त्या विषयावर त्याच त्या गप्पा मारीत असल्यामुळेही आपण इतरांना बोअर करीत असतो. महिला बोअर का होतात याचे महत्वाचे मानसशास्त्रीय कारण म्हणजे एक महिला स्वत:ला इतरांपेक्षा कमी मानते. एखाद्या श्रीमंत महिलेपुढे स्वत:ला गरिब समजणे आपण तिच्या बरोबरीने आहोत हे दाखविण्यासाठी खोटे बोलणे. कमी शिकलेल्या महिला जास्त शिकलेल्या महिलांना भेटल्यानंतर आपले दोष लपविण्यासाठी ती महिला आपल्या लेव्हलची समजेल अशा गप्पा मारते. पण असे प्रयत्न अयशस्वी होतात व ती स्त्री बोअर समजली जाते व हास्यास्पद ठरते.

बोलताना नेहमी समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्याकडे पाहावे. त्यामुळे समोरच्या व्यक्तीला आपल्या बोलण्यात रस आहे का हे कळते व त्यानुरुप बोलणे आवरते घेता येते.

# यशस्वी बना



जीवनात स्वत:साठी एक मार्ग बनवणे खरोखरच कठीण असते. आपण योग्य मार्गाने जात आहोत की नाही हेच आपल्याला कळत नसते. कधी आपण ध्येयापासून भरकटतो तर कधी ध्येय गाठण्यापूर्वीच हार मानू मार्गावर धावत राहण्यासाठी वाचा ही पाच सूत्र;

**ध्येय स्पष्ट हवे :** यश मिळवण्याची प्रक्रिया नेहमी ध्येय निश्चित करुन सुरु होते. आपण कोठे जात आहोत हेच माहित नसेल, तर आपण सावध व्हायला हवे. ध्येय ठरवणे म्हणजे आपली इच्छाशक्ती केंद्रीत करुन एका निश्चित दिशेने पुढे जाणे. आपले ध्येय लिहून ठेवून त्यावर तारीखही घालून ठेवा. ध्येय शब्दात मांडणे म्हणजे त्याला स्पष्ट रुप देणे. ध्येय निश्चिती आपल्याला खरे समाधान देते. ज्याची ध्येयप्राप्तीत जास्त गरज असते.

**ज्ञानवंताशी संपर्क साधा :** आपले ध्येय काहीही असो, ज्यांना आपल्यापेक्षा त्याबाबतचे जास्त ज्ञान आहे. अशा माणसांशी संपर्क राखण्याची योजना बनवा. आपले प्रयत्न त्यांच्या प्रयत्नांच्या आधारावर बनवा. तसेच काळानुरुप त्यात बदल व नैपुण्य आणा. कोणतेही काम लक्षपूर्वक करा. नवे काम करताना त्रास होणे स्वाभाविक असते; पण अशावेळी अनुभवी व्यक्तींचा सल्ला घ्यायला लाजू नका.

**दृढतेने ध्येयाकडे आगेकूच करा :** अपयशाचे मुख्य कारण स्वत:ची हानी करणारे वर्तन होय. वैयक्तीक ध्येयांशी न जुळणारे विचार व काम उदा. बढती मिळवू इच्छिणाऱ्या सेल्समनची ग्राहकाशी गैरवर्तन किंवा नोकरी मिळवू इच्छिणाऱ्याचे दिवसभर टी.व्ही. पाहात बसणे. आपल्याला आपले ध्येय गाठावयाचे असेल, तर त्यादृष्टीने सातत्याने प्रयत्न करीत राहायला हवे त्याचा ध्यास घ्यायला हवा.

**भावनिक शिस्त राखा :** शिस्तीविना स्वप्ने साकारणे कठीण असते. मोठे यश मिळवण्यासाठी जोखिम घ्यावी लागते. भले ती आर्थिक असो वा सामाजिक किंवा शारीरिक, भावनिक जबाबदारी हवीच. आपल्यात ती कामे करण्याची इच्छा असायला हवी. जी आपण पूर्वी कधीच केली नसतील.

**ध्येयाची समीक्षा व नूतनीकरण :** वारंवार आपल्या ध्येयांची यादी पुन्हा पुन्हा वाचत राहा. आपल त्यात एखाद्या समायोजनाची वा बदली गरज असेल तर अवश्य करा. जेव्हा आपले ध्येय गाठाल व त्यासंदर्भात एखादे मोठे पाऊल उचलाल तेव्हा त्याचा आनंद अवश्य साजरा करा.

# मुलायम केसांसाठी



शाम्पूची निवड केसांच्या टाइपवर अवलंबून असते. ती तशी केल्यास आपले केस खराब होणार नाहीत आपल्या गरजेनुसार शाम्पू करावा. ऑयली केसांना दर दिवसाआड शाम्पू करावा लागतो तर ड्राय केसांना दर दोन दिवसानंतर आणि नॉर्मल केसांना आठवड्यातून दोनदा शाम्पू करावा.

**ही दक्षतासुध्दा घ्यावी –**

- ड्राय केसांना शाम्पू करण्यापूर्वी तेलाने मसाज करावा म्हणजे केसांना पोषण मिळू शकेल.
- जर आपण कोमट पाण्याने शाम्पू करीत असाल तर शाम्पूनंतर केस एकदा थंड पाण्याने धुवा. यामुळे केसांची मुळे मजबूत होतील.
- कंडिशनिंगही हवे – तसे कंडिशन प्रत्येक प्रकारच्या केसांसाठी फायदेशीर असते. परंतु ड्राय केसांसाठी जास्त फायदेशीर असते.
- कंडिशनरमध्ये मॉश्चरायझर असते त्यामुळे ते वापरल्याने ड्राय केस चमकदार व सुंदर दिसतात. जर ऑयली केसांना कंडिशनर लावत असाल तर ते केसांच्या फक्त खालच्या भागालाच लावा.
- शाम्पू करण्यापूर्वी केस विंचरून घ्या. यामुळे केसांतील मळ तर जाईलच शिवाय मृतत्वाचाही निघून जाईल.
- केस ओले करून थोडासा शाम्पू घेऊन केसांच्या मुळाशी लावावा हळूहळू मुळांकडून टोकापर्यंत न्यावा केसांना शाम्पू लावताना नखांनी घासू नये. बोटांनी डोक्याच्या त्वचेला मालीश करावी व नंतर पाण्याने केस धुवावेत.
- केस धुण्यासाठी कोमट वा नळाचे पाणी वापरावे जोपर्यंत शाम्पू पूर्णपणे निघत नाही तोपर्यंत केस धुवावेत.
- केस धुताना मोठ्या दाताच्या कंगव्याने मुळापासून टोकापर्यंत केस विंचरत पाण्याने धुवावेत म्हणजे शाम्पू राहणार नाही.

# लग्नाआधी मुलींचे मत जाणून घ्या...!




विवाह योग्य मुलीचे विचार, इच्छा, अपेक्षा समजून घेऊन तिला काय हवे ते जाणून घ्या. आपण ज्या घरी लग्न जमवित आहात तेथे आपली मुलगी समन्वय साधू शकेल का ? वरपक्षाला मॉडर्न सून हवी असेल व आपली मुलगी मॉडर्न राहणे पसंत करीत नसेल तर ते स्थळ नाकारा.आपल्या सामाजिक जीवनात आज ज्या विसंगती, असंतोष, विरोधाभास, वाद, भांडणे, मानसिक तणाव व विस्कळीतपणा दिसत आहे त्यापैकी बहुतेकांचे कारण बहुधा कुटुंबामध्ये मुलीचे लग्न उरकून टाकण्याची घाई हेच आहे. त्यामुळेच हल्लीच्या बहुतेक मुलींचे वैवाहिक जीवन निराशामय असते. ते टाळण्यासाठी आई–वडिलांनी व कुटुंबीयांनी जास्त जबाबदारीने वागायलं हवे.

सून आणि मुलीतील फरक नव्या घरी मुलीला सून आणि मुलीतील फरकही माहीत नसतो. याबाबतीत आपण स्वत:च पुढाकार घेऊन आपल्या मुलीला तिने सासरकडील मंडळींच्या अपेक्षा समजून घ्याव्यात हे सांगावे. अशाप्रकारे वागूनच सून सासरी मान प्रतिष्ठा मिळवू शकते व सर्वांची आवडती होऊ शकते.

काही कुटुंबात लग्नापूर्वी पत्रिका जुळवून पाहिल्या जातात. जर आपल्याला याची गरज वाटत नसेल तर मुलीप्रमाणेच, मुलाच्या आईशीही आपल्या मुलीची पत्रिका जुळवून पाहा. कारण मुलीचा बराचसा वेळ घरातच जातो. सासुचा स्वभाव जाणून घेणे महत्वाचे असते. जर सासू उदारमताची व मायाळू असेल तर मुलगी प्रत्येक स्थितीत तडजोड करू शकेल.

मुलीच्या नोकरीविषयी विवेकाने निर्णय घ्या. आम्हाला सुनेची कमाई खायची आहे का ? हा विचार जुनाट, बुरसटलेला आहे. कारण प्रश्न पैशाचा नसून मुलीच्या प्रतिभेचा, क्षमतेचा असतो. यासाठी वरपक्षाच्या म्हणण्याने नोकरीची आहूती देऊ नका. मुलीच्या लग्नाबाबत घाईगडबडीत निर्णय घेऊ नका. दूरदर्शीपणासोबतच नजीकच्या काळात समस्या बनून समोर ठाकणाऱ्या गोष्टींचाही विचार करा. नेहमी चांगल्या अपेक्षा, आशा बाळगाव्यात हे जरी खरे असले तरी ज्याची आपण त्याबाबतही विचार करायला हवा. मुलीच्या वयाचा, स्वभावाचा, प्रवृत्तीचा, सवयींचा, अपेक्षांचा व भावी संसार यांचाही विचार करा. मुलीचे भविष्य पणाला लावू नका.

# मन गुंतवा कामात...



प्रेमात सारे काही विसरुन फक्त एकमेकांचा सहवास मिळवणे याला हुशारी म्हणता येणार नाही. प्रेम करणारे आपले सारे सुख प्रेमाच्या जगातच शोधात असतात यात संशय नाही; पण यशस्वी प्रेमाचे रहस्य आपल्या इतर कामात दडलेले असते.

जेव्हा आपण आपली इतर ध्येये गांभीर्याने घेतो, तेव्हा त्यावर आपले संपूर्ण लक्ष केंद्रीत करीत असतो. परीक्षेत उत्तम मार्क्स मिळवायचे असतील, स्पर्धेत एखादे स्थान पटकावयाचे असेल वा आपल्या प्रोफेशनलमध्ये प्रगती करायची असेल, ही सारी ध्येये काबीज करण्यासाठी आपल्या जीवाचे रान करावे लागते.

गंमत म्हणजे जेव्हा आपण इकडे लक्ष देतो तेव्हा आपल्या प्रेमीला आपल्याकडून आपण रिकामे असताना वेळ देत होता तेवढा वेळ मिळत नाही; पण याबद्दल आपल्या प्रेमाची कसलीही तक्रार नसते. उलट त्याच्या मनात आपल्याविषयी आदर व प्रेम वाढते.


आपण आपल्या ध्येयाकडे जसजसे जात राहाता, तसतसा आपला आमविश्वास वाढत जातो. आत्मविश्वास असलेली व्यक्त मन शांत ठेवते व शांतपणे निणय घेते. आपण आपले ध्येय गाठू शकतो, असा निर्धार केल्यानंतर आपला जोडीदारही आपल्याला हिंमत व ताकद देतो.

दोघांनीही आपापल्या ध्येयाकडे जायला हवे. दोघांनी यश मिळवण्याचा प्रयत्न करायला हवा. फक्त एकाचीच ऊर्जा प्रेमाला बळकटी देऊ शकत नाही. दोघेही पूर्णशक्तीनिशी आपले कामे करीत असतील व त्यातू वेळ काढून प्रेम करीत असतील, तर त्या प्रेमाची मजा द्विगुणीत होते.

बऱ्याच प्रेमींचे हेच रडगाणे असते की, त्यांचे मन इतर कोणत्याही कामात लागतच नाही; पण जर त्यांना सारे सोडून फक्त एकत्र राहायला सांगितले, तर लवकरच ते वैतागून उबून जातील कोणत्याही व्यक्तीचे इतर कोणतेही व्यक्तीमत्व आहे या गोष्टीचा परिणाप प्रेमावर होत असतो.

जी व्यक्ती आपले करिअर व्यवस्थित घडवते तीच आपले प्रेमही जोपासते, तर याचा अर्थ आपण आपल्या प्रेमाच्या नात्याबद्दल गंभीर आहात आणि केवळ टाईमपाससाठी प्रेम करीत नाही, असा होतो.

●●●



# कुटूंब असावे हसरे..!



पती ऑफिसात व्यस्त, मुले अभ्यास, ट्युशनमध्ये व्यस्त तर आपण आपल्या कामात यामुळे एकत्र बसायलाही कोणालाच वेळ नाही. अशा स्थितीत आपला परिवार हसरा खेळता राहण्यासाठी या काही टिप्स–

**हसा–हसवा :** मुलांसाठी जोक्सची काही पुस्तके आणा. त्यांना त्यातील मजेशीर जोक्स शोधायला सांगा. शोधताना त्यांना वाचून दाखवायला सांगा आणि पाहा घरात कशी हास्याची कारंजी उसळतात. ते कधी कधी मुलांच्या खोड्यांमध्ये साथ द्या. छोट्या भावाला छेडण्यासाठी मोठ्या वहिणीला मदत करा व गमतीची निखळ मजा लुटा.

**खेळा :** डिनर टेबलवर जेवण सर्व्ह होईपर्यंत वा जेवल्यानंतर काही मजेशीर खेळ खेळू शकता. उदा. ओळखा ओळखी – कलिंगडाची फोड खाताना अंदाज बांधा की, कोणाच्या फोडीत किती बिया निघाल्या व नंतर तपासून पाहा.

**म्याव–म्याव :** एकाने अंक म्हणण्यास सुरुवात करावी. प्रत्येक सम अंकासाठी म्याव म्हणावे. उदा. एक म्याव तीन म्याव. जो सर्वात जास्त चुका करील त्याने उरलेली सर्व भाजी संपवावी.

**रेनबो :** टेबलावर असलेल्या एकाच रंगाच्या सर्व वस्तू सांगणे. एकाने एक रंग निवडून त्याच्या टिममधील सर्वानी त्या रंगाच्या वस्तू सांगाव्यात.

**फरक ओळखणे :** मुलांना आपल्याकडे दोन मिनिटे पाहायला लावा. त्यानंतर त्यांना बाहेर पाठवा. ते माघारी येईपर्यंत स्वत:त बदल करा. उदा. लिपस्टिक शेड, कानातील रिंग्ज, केसांचा भांग आणि मुले तो बदल ओळखतात का, ते पाहा.

**पेपर वाचन :** रविवारी स्वत:सोबत मुलांनाही पेपर वाचायला द्या. पण पध्दत अशी हवी की, एकाने एक बातमी मोठ्यांना वाचून दाखवावी व नंतर कोणी, कोठे, का, कसे इ. प्रश्नांची माहीती सांगावी. थोड्या वेळानंतर त्या बातमीतील ते प्रश्न विचारून ती बातमी किती लक्षात आहे हे पाहावे.

**बक्षिसे द्या :** एखाद्या खेळात जिंकून, मिळालेली बक्षिसे मुलांमध्ये जिंकण्याची व आत्मविश्वासाचे भावना वाढवतात. आपसात स्पर्धा न करता घरातील सदस्यांना त्यांच्या स्वभाव गुणानुसार टायटल व बक्षिसे दिली, तर कुटुंबातील जवळीक आणखी वाढेल.

**ब्युटी सेशन :** एकमेकांचा डोक्याचा, मानेचा मसाज करा. केसांना व चेहऱ्याला पॅक लावा. जास्त वेळ असेल, तर नव्या पध्दतीने मेकअप करा.

**फिरायला जा :** कुटुंबियांसमवेत वरचेवर फिरायला जा. सोबत छान सीडीज व कॅसेट, खाण्या–पिण्याचे पदार्थ घ्या व हसा, खेळा, मजा करा.

## हायस्यविनोद

अरे, तू कपडे धुतोस की काय करतोस हे समजत नाही. मीनाताई धोब्याला रागावत होत्या.

धोबी गयावया करत म्हणाले 'काय झाले बाईसाहेब ?

हा टॉवेल पाहा किती स्वच्छ धुतला आहे.

'टॉवेल ?' मीनाताई चिडून म्हणाल्या,

'अरे धुवायला दिली तेव्हा ही चादर होती.

तिचा तू टॉवेल करुन टाकला आहेस काय म्हणावे तुला ?

**जाहीर नोटीस**
**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर–आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र.फौज जन्म–मृत्यू/एसआर २१८/२५ दिनांक:–११/५/२०२६

**नोटीस**

अलका दत्तात्रय वामन
रा.काळवाडी ता.जुन्नर जि.पुणे — अपिलार्थी
विरुध्द
निबंधक, जन्म–मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी / मुख्याधिकारी — प्रतिवादी
ग्रामपंचायत काळवाडी

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार श्री.अलका दत्तात्रय वामन रा.काळवाडी ता.जुन्नर,जि.पुणे यांनी चलूत सासू नामे कै.भागूबाई नामदेव वामन यांचा मृत्यू दि.२२/१२/२००४ रोजी मोजे काळवाडी,ता.जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा मृत्यू नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ २१८/२५ दि.०५.१२.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.११/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/–
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर–आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

**ग्रामपंचायत पाटेठाण ता.दौंड जि.पुणे**
**निविदा नोटीस क्र.१ सन २०२६–२०२७**

ग्रामपंचायत पाटेताण ता.दौंड जि.पुणे यांचेकडून खातीत नमूद कामांचे निविदा पद्धतीने दोन सीलबंद लिपतीने जिल्हा परिषद पुणे कडील खालील नमूद केलेल्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून २ पाकीट पद्धतीने मागवण्यात येत आहे. कोऱ्या निविदाचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय पाटेठाण ता.दौंड,जि.पुणे यांच्या कडून दि.२०/०५/२०२६ पासून दि.२७/०५/२०२६ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत देण्यात येतील आणि पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा कार्यालयेन सोयीच्या वेळी किंवा मासिक सभेच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | बयाना रक्कम | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम प भवन फर्निचर करणे | १३१९११/– | २३६ | १३०० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| २ | स्मशानभूमी शेड | १२६९८९/– | २३६ | ११७० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ३ | पानंद रस्ते दुरुस्ती | १२६९८९/– | २३६ | २२६५ | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ४ | ग्राप येथे पत्रा शेड उभारणे | २७६८००/– | २३६ | २७६८ | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ५ | प्राथ शाळा व अंगणवाडी येथे हँडवॉश स्टेशन | ६५०००/– | २३६ | २१९० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ६ | स्मशानभूमी सुशोभीकरण | २९९९६६/– | २३६ | २९९० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ७ | स्टोअर रूम बांधने | ३२५०००/– | २३६ | ३२५० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ८ | प्राथमिक आरोग्यकेंद्र दुरुस्ती कंपाऊंड | ८७९७८/– | २३६ | ८८० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ९ | एकलव्यवस्ती शौचालय | १४९९९४/– | २३६ | १५०० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| १० | पाणी पु. पाईप लाईन दुरुस्ती करणे | १६५७२५/– | २३६ | १६५० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| ११ | शौचालय बांधणे | १५९९९०/– | २३६ | १५९० | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| १२ | प्राथ. आरोग्य उपकेंद्र पाणीपुरवठा | ७०४४६/– | २३६ | ७०४ | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |
| १३ | आजा/दलितवस्ती समाजमंदिर/पाणी.पु.पालाईन | १९८६७८/– | २३६ | १९८६ | ६ महिने | जी.प.पुणे नोंदणीकृत सु.बे.अ |

निविदेच्या अटी शर्ती खालील प्रमाणे:
१. कोणतीही निविदा रद्द करणेचा, आवश्यक तो बदल करणे, कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा सर्व अधिकार ग्रामपंचायत पाटेठाण यांनी राखून ठेवला आहे.
२. सदर कामाच्या अटी व शर्तीचा संपूर्ण तपशील निविदा संचांमध्ये नमूद केलेला आहे.
३. बयाना रक्कम कोणत्याही पद्धतीने रोख /DD/RTGS द्वारे PDCC बँक शाखा राहू खाते क्र. ०५२००२७००००००३ ग्रामपंचायत पाटेठाण यांच्या खात्यावर जमा करून त्याची पावती किंवा DD लिफापा क्र.१ मध्ये जोडणे आवक्षक आहे, त्याशिवाय लिफापा क्र.२ उघडला जाणार नाही, बयाना रक्कम फक्त सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रवर्गासाठी असलेल्या कामांसाठी सूट देण्यात येईल.
४. यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्व दाखले जोडावेत, सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रकरणेचा अथवा स्वीकारण्याचा सर्व अधिकार ग्रामपंचायत पाटेठाण यांनी राखून ठेवला आहे.

सही/–
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत पाटेठाण ता.दौंड, जि.पुणे

# छान छान गोष्टी

## न्यायी राजा श्वेतकेतू

वल्लभपूर नावाचे एक राज्य होते. तेथे राज्य करीत होता राजा श्वेतकेतू. राज्यात सर्वत्र आबादी आबाद होते. राजा मोठा न्यायी होता.

एकदा त्याच्या राज्यात चोरी करत असताना चार लोक चोरी करताना पकडले गेले. राजाने त्यांना मृत्यूदंड ठोठावला.

त्या चार चोरांपैकी एक जण अगदी मुरलेला चोर नव्हता. एक चांगला शिकलेला, हुशार माणूस होता. केवळ नाइलाजानेच तो चोरांच्या टोळीत सामील झाला होता, आणि पहिल्याच चोरीत पकडला गेला होता. त्याने एक युक्ती करायचे ठरवले.

त्याने पहारेकऱ्यांमार्फत राजाला निरोप पाठवून भेटण्याची इच्छा प्रकट केली. अत्यंत महत्त्वाची माहिती सांगायची आहे असे कळवले. राजाने त्याला बोलावून घेतले.

'महाराज,' तो चौथा चोर म्हणाला,'मला सोन्याची शेती कशी करायची ते माहित आहे. संपूर्ण जगात ही माहिती असणारा मी एकटाच आहे. मी मेलो तर हे ज्ञान लुप्त होईल. ते मी तुम्हाला देऊ इच्छितो. जर राज्यात सोन्याचे पीक येऊ लागले, तर राज्य जगात सर्वात श्रीमंत होईल. मग चोऱ्यामाऱ्या होणारच नाहीत. सर्व सुखी होतील.'

राजाचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला. त्याने सोन्याची शेती शिकून घ्यायचे ठरवले.

चौथ्या चोराने शेत निवडले. चांगले नांगरून घेतले. राजाला सोन्याचे दाणे तयार करून घ्यायला सांगितले, बियाणं म्हणून वापरायला राजाने सोनारांकडून चांगली दोन पोती भरून सोन्याचे बियाणं करून घेतले.

ते पेरायची वेळ आली तेव्हा चौथा चोर म्हणाला, महाराज बियाणं आपल्याला पेरावं लागेल. कारण मी चोरी केली, खोटं बोललो आहे. मी पेरलेलं बियाणं उगवणार नाही. आपण आयुष्यात कधी खोटं बोलला नसाल, चोरी केली नसेल. आपणच हे बी पेरा. राजाला आठवले, लहानपणी अन् मोठेपणी आपण अनेकदा खोटं बोललो आहोत, बोलावं लागलं आहे. लहानपणी काही चोरून घेतले, खाल्ले असेल. आपण पेरूनही उपयोग होणार नाही.

मग प्रधान, सेनापती, सरदार प्रजाजन साऱ्यांना बोलावून ज्याने कधी चोरी केली नाही, खोटे बोलला नाही असा कोणीही नव्हता. सोन्याच्या शेतीची कल्पना गुंडाळली गेली. चौथा चोर म्हणाला, 'महाराज सर्वांना काम मिळाले, पोट भरले तर कोणी कशाला चोरी करील ?'

राजाला ते पटले, त्याने सर्व चोरांना सोडले व प्रजेला सुखी करण्याचे तो आणखी मार्ग शोधू लागला. त्याने चोरालाच प्रधान केले.

# देशाला 'संपन्न ऊर्जा' राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्राचे बळ मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्य शासनाचा अणुऊर्जा निर्मितीसाठी कंपन्यांशी सामंजस्य करार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले.



यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य ऊर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे. ही गुंतवणूक केवळ ऊर्जा निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे.

कंपन्यांनी सामंजस्य करार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आणण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण करावे. या कामी राज्य शासनाचा संबंधित विभाग त्यांना सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. याप्रसंगी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व कंपन्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांमध्ये करारांचे आदान-प्रदान करण्यात आले. अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून ६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल. तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांचीगुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

# राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे, १६५२ वाड्यांमध्ये ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्याअसून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शासनाने विविध जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे.

दिनांक ११ मे ते १७ मे २०२६ दरम्यानच्या कालावधीतील अहवालनुसार राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमध्ये एकूण ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या टँकरमध्ये ३३ शासकीय तर ६६९ खासगी टँकरचा समावेश आहे. वाढत्या तापमानामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीस्त्रोत कोरडे पडू लागल्याने अनेक ग्रामीण भागांमध्ये टँकर हा नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार ठरत आहे. ठाणे विभागात सर्वाधिक १७७ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १५५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर नाशिक विभागात १५६ गावे आणि ४४४ वाड्यांसाठी १५९ टँकर कार्यरत आहेत. पुणे विभागात १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी एकूण २४४ टँकर कार्यरत असून राज्यातील सर्वाधिक टँकर या विभागात वापरण्यात येत आहेत. अमरावती विभागात १७ गावांसाठी १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागपूर विभागात सध्या कोणत्याही ठिकाणी टँकरची आवश्यकता भासलेली नाही.

राज्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायती आणि पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांना नियमित आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असून टँकर पुरवठ्याबरोबरच पर्यायी जलस्त्रोतांचा वापर, विहिरींचे अधिग्रहण आणि जलसाठ्यांचे नियोजन यावरही भर दिला जात आहे.

# साठीवरील ज्येष्ठांच्या क्रिकेट स्पर्धा : ज्येष्ठ साहित्यिक विजय तारी यांनी केला मल्ल्या वराडकर फ्रेंड्स क्लबचा गौरव



जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : सद्गुणांना शोभा यावी, विरोधकानेही अवाक होऊन पहावे आणि वैऱ्यानेही प्रेमात पडावे, असे व्यक्तिमत्त्व रवि मल्ल्या यांचे आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ साहित्यिक विजय तारी यांनी अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेल्या रवि मल्ल्या यांच्या नेतृत्वाखालील मल्ल्या वराडकर फ्रेंड्स क्लबची मुक्तकंठाने प्रशंसा केली. मल्ल्या वराडकर फ्रेंड्स क्लब बोरिवली तर्फे ६० वर्षावरील खेळाडूंसाठी बोरिवली येथील एम सी एफ जॉगर्स पार्क मैदानात रमाकांत राणे चषक मर्यादित षटकांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. वयाची ७५ वर्षे ओलांडलेले क्रिकेटपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ कवी, साहित्यिक श्री. विजय तारी यांनी श्रीफळ वाढवून केले. त्यांनी साठ वर्षांवरील सर्वच खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी केलेल्या छोटेखानी भाषणात विजय तारी यांनी नांदी संपल्यावर पडदा उघडला. तेंव्हा मी तुडुंब भरलेला होतो. हजारो रंगीबेरंगी शब्दांनी शरीरभर रोडावणाऱ्या असंख्य आविर्भावांनी, भीतींनी, आशांनी व अपेक्षांनी. आणि भरतवाक्य संपल्यावर समोरचं प्रेक्षालय रितं झालंय. आणि संहितेत नसलेल्या प्रयाणांची तयारी करीत मी रंगमंचावर उभा आहे एकटा, समोरच्या प्रेक्षालयासारखा संपूर्ण रिकामा. अर्थात, माझे काही शब्द प्रेक्षालयातील धुसर मंद प्रकाशात पिंजारलेल्या कापसासारखे हवेत तरंगत आहेत अजूनही. माझे काही आविर्भाव प्रेक्षालयातील रिकाम्या खुर्च्यांना बिलगून बसले आहेत अजूनही.

# ई-चलन संदर्भातील मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेऊ : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## वाहतूकदारांना न्याय देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत भेट घेऊन ई-चलन प्रणाली, वेगमर्यादा नियम, एएनपीआर कॅमेरे तसेच दंड आकारणी संदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वाहतूकदारांच्या मागण्यांबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीचे अध्यक्ष प्रदीप राठोड, सदस्य मनोज चौगुले, महेंद्र काळभोर, पंकज त्रिपाठी, अशोक शिंदे, गौरव कुसाळे, रफिक रावथर, अशोक कुचकोरवी, राजु ढाले, सुनील मगदुम आदी उपस्थित होते.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात जुन्या ई-चलनांची सरसकट रद्दबातल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेगमर्यादेचा पुनर्विचार, एएनपीआर कॅमेऱ्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा, वाहनांमधील अंतराच्या नियमांमध्ये व्यवहार्य बदल तसेच दंडावरील चक्रवाढ पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहतूक व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे वाहतूकदारांच्या अडचणी शासन गंभीरपणे ऐकत असून, नियमांची अंमलबजावणी करताना अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल. ई-चलन आणि वेगमर्यादा संदर्भातील तक्रारींबाबत संबंधित विभागांकडून सविस्तर अहवाल मागवून आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. तसेच, रस्ते सुरक्षा अबाधित ठेवत वाहतूकदारांना दिलासा मिळेल, अशा पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# सिंधुदुर्गात साकारतेय भारतातील पहिले अंडरवॉटर म्युझियम, कृत्रिम प्रवाळ आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्प : जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे

जनप्रवास : प्रतिनिधी

सिंधुदुर्गनगरी : निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक वारसा आणि सागरी पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शिरपेचात आता आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. भारतातील पहिले अंडरवॉटर म्युझियम, कृत्रिम समुद्री प्रवाळ प्रकल्प आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती रॉक्स परिसरात साकारत असून, हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प देशातील सागरी पर्यटन क्षेत्राला नवे परिमाण देणारा ठरणार आहे. भारतीय नौदलाची अभिमानास्पद युद्धनौका आयएनएस गुलदार सेवामुक्त झाल्यानंतर आता या युद्धनौकेचे रूपांतर समुद्राखालील अद्वितीय पर्यटन केंद्रात करण्यात येत आहे. समुद्रतळाशी नियोजित पद्धतीने विसर्जित करण्यात येणारी ही युद्धनौका पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र ठरणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला लाभलेल्या नैसर्गिक संपदेचा शाश्वत विकास साधत पर्यटन क्षेत्राला नवे आयाम देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अंडरवॉटर म्युझियम आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्पामुळे देश-विदेशातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर



आकर्षित होतील. स्थानिक युवकांना रोजगार, पर्यटन व्यवसायाला गती आणि जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्यास या प्रकल्पाचा मोठा हातभार लागणार असल्याचे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी सांगितले.

तारकर्ली येथील इसदा येथे आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे बोलत होत्या. एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, माझगाव शिपयार्डचे निपेंद्र निरव, पाणबुडी तज्ञ सुनील कोरटी, एमटीडीसीचे अधीक्षक अभियंता संजय पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जितेंद्र सोनवणे, वरिष्ठ व्यवस्थापक जल पर्यटन क्षिप्रा बोरा, व्यवस्थापक बांधकाम दीपक हरणे, प्रादेशिक अधिकारी दीपक माने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पुढे म्हणाल्या की, या प्रकल्पाच्या माध्यमातून समुद्राखाली कृत्रिम प्रवाळांची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यामुळे सागरी जीवसृष्टीला पोषक अधिवास उपलब्ध होणार असून पर्यावरण संवर्धनालाही मोठी चालना मिळणार आहे. पर्यावरणपूरक पर्यटनाचा आदर्श निर्माण करणारा हा प्रकल्प जैवविविधतेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. स्कूबा डायव्हिंग, अंडरवॉटर एक्सप्लोरेशन आणि सागरी जैवविविधतेचा अनोखा अनुभव घेण्याची संधी पर्यटकांना मिळणार आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग हे केवळ समुद्रकिनाऱ्यांपुरते मर्यादित न राहता 'अंडरवॉटर टुरिझम डेस्टिनेशन' म्हणून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणार आहे. सागरी पर्यटन, साहसी पर्यटन आणि पर्यावरण संवर्धन यांचा संगम साधणारा हा प्रकल्प राज्याच्या पर्यटन क्षेत्रासाठीही एक मैलाचा दगड ठरणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे म्हणाले की , गुलदार पाहण्यासाठी पाणबुडी निर्मितीचे काम सुरू आहे. दीडवर्षात पाणबुडी तयार होऊन पर्यटकांच्या सेवेत दाखल होणार आहे.

# सातारा शासकिय गोदामातील माथाडींना चार महिने वेतन नाही; राज्यव्यापी आंदोलनाचा रामिष्टे यांचा इशारा

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : सातारा जिल्ह्यातील विविध शासकीय गोदामातील माथाडी कामगारांना गेल्या चार महिन्यात वेतन मिळाले नसून या कामगारांनी उपाशीपोटी काम करावे, अशी शासनाची अपेक्षा आहे का? असा तिखट सवाल अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे सरचिटणीस तसेच भाजप कामगार मोर्चाचे वरिष्ठ उपाध्यक्ष अविनाश रामिष्टे यांनी केला आहे.

सातारा जिल्ह्यातील शासकीय गोदामातील माथाडी कामगार अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे सभासद आहेत. तसेच सातारा माथाडी असंरक्षित कामगार मंडळाकडे नोंदित आहेत. या कामगारांचे मासिक वेतन वीस हजार रुपयांच्या आसपास आहे. मात्र, जानेवारी महिन्यापासून सलग गेले चार महिने त्यांना वेतन मिळालेले नाही. वास्तवात माथाडी अधिनियमन १९६९ मधील तरतुदीनुसार नोंदित मालकाने प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेच्या आत कामगारांची मजुरी व लेवी यांचा भरणा माथाडी मंडळाकडे करणे आवश्यक असते.

माथाडी कामगारांकडून करण्यात येत असलेले धान्याच्या पोत्यांच्या चढ-उताराचे काम अत्यावश्यक सेवेत येते. या कामगारांनी काम बंद केल्यास तालुका, जिल्हा पातळीवरील धान्य पुरवठा विस्कळीत होऊ शकतो.यापार्श्वभूमीवर या कामगारांनी आंदोलन करू नये, काम बंद केल्यास ते बेकायदेशीर ठरेल, असे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी संघटनेला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. परंतु शासन वेतनही देणार नाही व त्यासाठी कामगारांनी आंदोलनही करू नये, असे शासनाचे म्हणणे असेल तर कामगारांनी जगायचे कसे, त्यांनी उपाशीपोटी काम करावे, अशी शासनाची अपेक्षा आहे का? जे कामगार जनतेला वेळच्यावेळी अन्नधान्य मिळेल याची काळजी घेतो, त्यालाही पोट आहे, त्यालाही कुटुंब आहे, याची सरकारला काळजी का नाही. साताऱ्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासह सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे पगार महिन्याच्या महिन्याला होतात, मग कष्टकरी माथाडी कामगारांचे पगार का होत नाहीत, असे सवाल अविनाश रामिष्टे यांनी केले आहेत.

## कला विश्व

# सलमान खान ते सुष्मिता सेन; वयाची पन्नाशी उलटून गेली तरीही बॉलीवूडच्या काही कलाकारांनी केले नाही लग्न

आपल्या आवडत्या कलाकारांच्या नवनवीन चित्रपटांबरोबरच त्यांच्या खासगी आयुष्याबद्दल जाणून घेण्यासही प्रेक्षक उत्सुक असतात. गेल्या काही दिवसांपासून सलमान खान मोठ्या चर्चेत आहे. सलमान खानने सोशल मीडियावर फोटो शेअर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. तसेच, एकटेपणा संबंधित दिलेल्या कॅप्शनवरुनही चांगलीच चर्चा रंगली होती. सलमान खान सध्या ६० वर्षांचा आहे. मात्र, अद्याप तो अविवाहित आहे. आतापर्यंत बॉलीवूडमधील अनेक अभिनेत्रींबरोबर त्याचे नाव जोडले गेले. यामध्ये संगीता बिजलानी, ऐश्वर्या राय, कतरीना कैफ या लोकप्रिय अभिनेत्रींबरोबर तो रिलेशनशिपमध्ये होता. मात्र, कोणत्या ना कोणत्या कारणाने त्याचे ब्रेकअप झाले. त्याच्या



सगळ्याच रिलेशनशिपची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. सलमान खानबरोबर इंडस्ट्रीमध्ये असे अनेक कलाकार आहेत, ज्यांचे वय ५० हून अधिक आहे, तरीही अजूनही त्यांनी लग्न केले नाही. आता हे कलाकार कोणते आहेत, हे जाणून घेऊ

### तब्बू

बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून तब्बूला ओळखले जाते. तब्बू विविध भूमिकांतून प्रेक्षकांच्या भेटीला येते. पण, तब्बूने आतापर्यंत लग्न केले नाही. विविध मुलाखतींमध्ये लग्न करण्याबद्दल अभिनेत्रीने तिचे मत सांगितले आहे. तब्बूच्या म्हणण्यांनुसार, लग्न न करणे ही तिचा वैयक्तिक प्रश्न आहे आणि ती सिंगल असली तरी आनंदी आहे.

### अक्षय खन्ना

धुरंधर सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर ज्या अभिनेत्याची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली, तो अभिनेता म्हणजे अक्षय खन्ना. अक्षय खन्ना ५१ वर्षांचा आहे. तो त्याच्या विविध भूमिकांमधून प्रेक्षकांची मने जिंकतो. त्याने एका मुलाखतीत स्पष्टपणे सांगितले होते, त्याला लग्न करायचे नाही. त्याला एकटे राहणे आवडते.

### अमीषा पटेल

गदर व कहो ना प्यार है या सिनेमांतून लोकप्रिय ठरलेली अभिनेत्री अमिषा पटेल ही आजही सिंगल आहे. तिचे वय ५१ वर्षांहून जास्त आहे.

### राहूल खन्ना

अक्षय खन्नाचा मोठा भाऊ राहुल खन्ना सध्या ५३ वर्षांचा आहे. तो त्याच्या स्टाइल आणि लूकमुळे लोकप्रिय आहे. मात्र, तोसुद्धा अक्षयप्रमाणेच अविवाहित आहे.

### उदय चोप्रा

धूम फेम अभिनेता व निर्माता उदय चोप्राचे वय ५३ इतके आहे. मात्र, आजही तो अविवाहित आहे.

### साजिद खान


दिग्दर्शक साजिद खान ५४ वर्षाचे आहे. मात्र, साजिद खाननेही लग्न केले नाही.

### सुष्मिता सेन

लोकप्रिय अभिनेत्री सुष्मिता सेनचे वय ५० वर्षे इतके आहे, तिनेही आतापर्यंत लग्न केले नाही. तिने दोन मुलींना दत्तक घेतले आहे.

# हॉरर सिनेमांतून केलेली कोट्यवधींची कमाई पण बॉलीवूडने उडवलेली खिल्ली

असा एक काळ होता जेव्हा बॉलीवूडमध्ये रोमँटिक आणि सामाजिक विषयावर भाष्य करणारे चित्रपटांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत होती, तेव्हा खूप कमी निर्माते हॉरर सिनेमे बनवत होते. महल आणि बीस साल बाद अशा चित्रपटांचा यामध्ये समावेश होतो. या चित्रपटांची निर्मिती रामसे बंधूंनी केली होती. १९७० च्या दशकात या चित्रपटांना प्रेक्षकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. दो गज जमीन के नीचे, पुराना मंदिर, वीराना, पुरानी हवेली, बंद दरवाजा असे अनेक चित्रपट मोठ्या प्रमाणात गाजले. इतके यश मिळाले असले तरी चित्रपट निर्माते त्यांना कायमच ते सी ग्रेड चित्रपट बनवत असल्याचे म्हणतात. आता तुलसी रामसे यांचा मुलगा दीपक रामसे यांनी एका मुलाखतीत यावर वक्तव्य केले आहे. दीपक रामसे यांनी नुकतीच हिंदी रशला मुलाखत दिली. या मुलाखतीत ते म्हणाले, आमचे चित्रपट अत्यंत कमी बजेटमध्ये बनत असत. ते प्रायोगिक सिनेमे होते. नवीन कलाकारांना एकत्रित आणणे, त्यांना महाबळेश्वरला नेणे आणि पूर्ण चित्रपट बनवणे हा इतरांसाठी विनोद होता. इतर चित्रपट निर्माते १०० लोकांबरोबर काम करत असत, त्यांच्याकडे व्हॅनिटी व्हॅन असत, त्यांचे बजेट मोठे असे, मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असे. पण, हे सगळे करूनही त्या चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळेलच असे नाही. दुसरीकडे रामसे बंधूंचे कमी बजेटचे चित्रपट मोठ्या प्रमाणात कमाई करत असत. अनेक वितरकांनी आमच्या चित्रपटांमधून इतके पैसे कमावले की, अखेरीस ते प्रस्थापित वितरक बनले. दीपक रामसे असेही म्हणाले, जेव्हा ए-लिस्ट फिल्म, विशेषत:जेव्हा अमिताभ बच्चन यांची



भूमिका असलेले चित्रपट जेव्हा प्रदर्शित व्हायचे, तेव्हा त्या चित्रपटाबरोबर इतर कोणताही चित्रपट प्रदर्शित करण्याचे धाडस कोणीही करत नसे. जर बिग बींच्या चित्रपटाबरोबर सिनेमा प्रदर्शित केला, तर तुमचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल, असे मानले जायचे, इतकी अमिताभ बच्चन यांची लोकप्रियता होती. याला अपवाद फक्त रॅमसे बंधूंचा होता. रॅमसे बंधूंनी अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, राजेश खन्ना या सुपरस्टार कलाकारांच्या चित्रपटांबरोबर त्यांचे चित्रपट प्रदर्शित केले. याचे कारण म्हणजे आम्हाला आमच्या चित्रपटांवर विश्वास होता.

कपूर कुटुंबाशी होणाऱ्या तुलनेबद्दल बोलताना दीपक रामसे म्हणाले, कपूर कुटुंब खूप मोठे आहे. त्यांच्याशी आमचे सलोख्याचे संबंध होते. राज कपूर यांची चित्रपट निर्मितीची शैली आणि चित्रपटांचे प्रकार पूर्णपणे वेगळे होते, त्यामुळे कपूर आणि रॅमसे यांच्या चित्रपटांची तुलनाच होऊ शकत नाही. आम्ही पृथ्वीराज कपूर यांच्या काळापासून एकत्र काम करत आलो आहोत. पण रामसे हे कोणत्याही प्रकारे कमी दर्जाचे चित्रपट बनवत नव्हते. चित्रपट यशस्वी होईल यासाठी ते प्रयत्न करायचे. १९७० च्या दशकात चित्रपटसृष्टीने रामसे बंधूंची फारशी दखल घेतली नाही. पण, 'पुराना मंदिर'च्या यशानंतर परिस्थिती बदलली. तेव्हाच कपूर कुटुंबासह बॉलिवूडमधील सर्वात मोठ्या चित्रपट घराण्यांनीही त्यांची दखल घ्यायला सुरुवात केली.

* मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com